

Book Code : EDU 424
Subject Code : EDU 424

ज्ञान आणि अभ्यासक्रम

EDU 424

अधिष्ठान अभ्यासक्रम

ज्ञानगंगा घरोघरी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

EDU - 424

ज्ञान आणि अभ्यासक्रम

लेखक : डॉ. कविता साळुंखे, प्रा. एम.एस.उभाळे, प्रा. गजानन सपकाळ, डॉ. प्रीती पाटील, डॉ. डी.डी. पवार, डॉ. सज्जन थूल, डॉ. सोनुने एस.एन, डॉ. डी.एस. सूर्यवंशी, डॉ. पी.बी. दराडे, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. कुंभारे गोपाळकृष्ण, डॉ. नवनाथ इंदलकर, डॉ. भदाणे एम.ए., श्रीमती कल्पना साळुंखे, प्रा. विजयकुमार पाईकराव, श्रीमती अनिता थोरात, श्रीमती ज्योती लष्करी, डॉ. उमाकांत देशमुख

घटक १ : ज्ञान आणि ज्ञाननिर्मिती ०१

घटक २ : ज्ञाननिर्मिती प्रक्रिया ३४

घटक ३ : अभ्यासक्रम ६३

घटक ४ : अभ्यासक्रम विकसन ९३

घटक ५ : अभ्यासक्रम अंमलबजावणी व पुनर्रचना ११३

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. ई. वायूनंदन

प्र. संचालक : डॉ. कविता साळुंके

तज्ज्ञ सल्लागार समिती

डॉ. कविता साळुंके, नाशिक
डॉ. रूपा बोधी कुलकर्णी, नागपूर
श्री. सुभाष लोमटे, औरंगाबाद
प्रा. राजू देसले, नाशिक
प्रा. विजयकुमार पाईकराव, नाशिक
डॉ. संजीवनी महाले
डॉ. विजया पाटील
डॉ. डी. डी. पवार
डॉ. एस. एस. सोनुने

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

डॉ. कविता साळुंके
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
प्राचार्य डॉ. चंद्रकांत बोरसे
अँड. विठ्ठलराव हंडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय
नाशिक
डॉ. एस. व्ही. एस. चौधरी
माजी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
इग्नू, नवी दिल्ली
प्राचार्य डॉ. विजय अयलेकर
चेंबूर सर्वकश शिक्षणशास्त्र महाविद्यालय
चेंबूर, मुंबई
प्राचार्य डॉ. आर. बी. मानेकर
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला
प्राचार्य डॉ. उर्मिला धूत
शासकीय अध्यापक महाविद्यालय, परभणी
प्रा. माधव पळशीकर
सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा
डॉ. जयदीप निकम, संचालक, आयेाय विद्याशाखा
डॉ. हेमंत राजगुरू
सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
डॉ. सुरेश पाटील
सहयोगी प्राध्यापक, मुल्यमापन विभाग
डॉ. संजीवनी महाले
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
प्रा. विजयकुमार पाईकराव
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
डॉ. विजया पाटील
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
डॉ. डी. डी. पवार
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
डॉ. एस. एस. सोनुने
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

पाठ्यक्रम समिती

डॉ. कविता साळुंके
प्रा. विजयकुमार पाईकराव, नाशिक
डॉ. रूपा बोधी कुलकर्णी, नागपूर
प्रा. राजू देसले, नाशिक
प्रा. विजय कांबळे, हिंगोली
अँड. मिलिंद बाबर, नाशिक

लेखक समिती

श्रीमती सुजाता बाबर
नाशिक
प्रा. विजयकुमार पाईकराव
(सहयोगी प्राध्यापक) शिक्षणशास्त्र विद्याशाखा

संपादन समिती (आशय, भाषा व अनुदेशन)

प्रा. विजयकुमार पाईकराव, नाशिक
शिक्षणक्रम समन्वयक
डॉ. रूपा बोधी कुलकर्णी, नागपूर
अध्यक्ष, विदर्भ मोलकरीण संघटना, नागपूर
डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

निर्मिती

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

First Edition developed under DEC development grant.

© २०२०, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

❑ प्रथम मुद्रण : डिसेंबर २०२० ❑ प्रकाशन क्रमांक : २२९०

❑ मुखपृष्ठ रेखाटन : अविनाश भरणे

❑ अक्षरजुळणी : मानस एंटरप्राईजेस, इंदिरानगर, नाशिक - ९.

❑ मुद्रक : मे. नीट प्रिंटस्, प्लॉट नं. डब्ल्यू-३६/सी-१, एम.आय.डी.सी., अहमदनगर - ४१४ १११.

❑ प्रकाशक : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरूंचे मनोगत

स्तरनिहाय अध्ययन-अध्यापन प्रक्रिया शिक्षण प्रक्रियेत चालते. त्यानुसार शिक्षणातून साध्य करावयाच्या बाबींचे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तकात वर्गीकरण केलेले असते. अभ्यासक्रमाद्वारे शिक्षणाची ध्येय व उद्दिष्टे तसेच विद्यार्थ्यांच्या वर्तनात विशिष्ट कालावधीत करावयाचे बदल साध्य केले जातात. कालानुरूप अभ्यासक्रमात बदल करावे लागतात. त्यामुळे विद्यार्थी, समाजाच्या शिक्षणाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करतो. थोडक्यात अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक विकासाची अपेक्षा असल्याने अभ्यासक्रमाला शिक्षणव्यवस्थेमध्ये महत्त्वाचे स्थान असते.

अभ्यासक्रम म्हणजे विशिष्ट स्तरावरील प्रक्रियेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक क्षेत्रात बदल घडविण्यासाठी ठरवून दिलेली चौकट असे म्हणता येईल. ज्यामध्ये विषयांच्या मार्गावरून विद्यार्थी उद्दिष्टाप्रत मार्गक्रमण करतो. अभ्यासक्रमाची विविध ध्येये असू शकतात. त्या ध्येयाची समाज त्यांच्या गरजांनुसार अंगीकार करीत असतो. त्या ध्येयाला अनुसरून शाळा, महाविद्यालयात विषयाचे हेतू ठरविले जातात. अभ्यासक्रमाचे ध्येय, उद्दिष्ट, पाठ्यक्रम, अध्यापनपद्धती व तंत्रे, परीक्षा व मूल्यमापन ह्या सर्व बाबी त्यात येतात.

ज्ञान हे मानवी जिज्ञासेतून निर्माण झालेले असते. आयुष्यामध्ये मनुष्य सत्याचा जो शोध घेतो त्यातून ज्ञानाची निर्मिती होते. हा सत्याचा शोध विज्ञान व तंत्रज्ञान ह्या दोहोंतून होतो. विश्वाची निर्मिती कशी झाली. विश्वाचा शेवट कसा होणार आहे, सजीव निर्मितीचे प्रयोजन काय, विश्वामध्ये कोणते मूलभूत नियम आहेत. विश्वाची रचना नेमकी काय आहे, जीवनाचा नेमका अर्थ काय आहे, असे कितीतरी प्रश्न तत्त्वज्ञान आणि विज्ञान यामध्ये समान आहेत.

तत्त्वज्ञान हे तर्क आणि कल्पनाशक्ती यांचा विचार करून आणि अमूर्त विचारांच्या चढत्या श्रेणीने अंतिम सत्यापर्यंत जाण्याचा प्रयत्न करीत असते. तर प्रयोग, निरीक्षण, मापन आणि पडताळा या चतुःसूत्रीचा वापर करून विज्ञान टप्प्याटप्प्याने सत्याकडे वाटचाल करीत असते. यातून ज्ञानाची निर्मिती होते.

शिक्षणात अध्ययन-अध्यापन ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. पूर्वी गुरूकुल पद्धती होती तेव्हा गुरूगृही राहून त्यांच्याकडून ज्ञान ग्रहण केले जाई. त्या पद्धतीत गुरू केंद्रस्थानी असे. 'गुरुवर्य देवो भव' असे म्हटले जाई. पुढे विद्यार्थ्यांचा अध्ययन प्रक्रियेचा विचार होऊ लागला. त्यामुळे अध्यापनासोबतच अध्ययनालाही महत्त्व प्राप्त झाले. विद्यार्थ्यांचे अध्ययन आणि शिक्षकाचे अध्यापन ह्या एका वेळी चालणाऱ्या प्रक्रिया होत. त्या दोन्हींचा सुवर्णमध्य साधला तरच उत्तम अध्ययन होऊ शकते. त्यामुळे आज ज्ञान आणि अभ्यासक्रम दोन्ही घटकांना शिक्षणात महत्त्वाचे स्थान आहे. जे शिक्षकांनी सविस्तरपणे जाणून घ्यायला हवे. त्यासाठी हा विषय तुम्हाला मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

प्रास्ताविक

शिक्षणप्रक्रियेत दाता, ज्ञेय आणि ज्ञाता हे तीन प्रमुख घटक असतात. दाता म्हणजे ज्ञान देणारा, ज्ञेय म्हणजे द्यावयाचे ज्ञान किंवा संदेश आणि ज्ञाता म्हणजे ज्ञान जाणून घेणारा. तेव्हा दात्यापासून ज्ञात्यापर्यंत ज्ञानाचे संक्रमण होत असते. भौतिक परिसर आणि मानसिक विश्व यासंबंधी मानववंशाच्या प्रारंभापासून माणसाने त्या-त्या गोष्टी जाणून घेतल्या. 'अथतो ब्रम्ह जिज्ञासा' या जिज्ञासू वृत्तीमुळे परिसरातील घटना. वैश्विक घटना आणि मानसिक घटना यांविषयी मानवाला कुतूहल वाटले. त्याची उत्सुकता जागृत झाली. त्यांच्या क्षमणार्थ मानवाने उद्‌गामी अवगामी, तर्क आणि अन्य विचारपद्धतींचा वापर करून ज्ञानकण प्राप्त करून त्यांचा संग्रह केला. त्यातून संस्कृती निर्माण केंली आणि हा सांस्कृतिक वारसा मागच्या पिढीने पुढच्या पिढीला दिला. प्रत्येक पिढीने त्यामध्ये काहीतरी भर टाकण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आणि त्यातून ज्ञानाचा संग्रह अफाट वाढत राहिला. पीटर ड्रकर यांसारख्या व्यवस्थापन तज्ज्ञ असे म्हणतो की, ' आधुनिक जगात ज्ञानाचा विस्फोट झाला'. असे म्हटले जाते की, दर ३५ वर्षांनी लोकसंख्या दुप्पट होते तर दर दहा वर्षांतच ज्ञान दुप्पट होत असे. आता हा दर ५ वर्षांपर्यंत खाली आलेला आहे. परिणामी या जगातील ज्ञानाचे संदर्भ आणि संबंध सतत बदलत असतात.

वैज्ञानिक शोध तसेच तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ज्ञानाच्या वाढीस मोठी चालना मिळाली आणि नव्या विद्याशाखा उद्‌यास आल्या. ज्ञाननिर्मिती संदर्भात भारतीय पाश्चत्य विचारवंतानी आपले विचार मांडले आहेत. ते विचार कोणते? त्याचा आपल्या शिक्षणात कसा विचार करता येईल या बाबीही महत्त्वाच्या वाटू लागतात.

ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचवण्याची मुख्य व्यवस्था म्हणजे शिक्षण. कोणत्या वयाच्या विद्यार्थ्यांला काय शिकवायचे म्हणजेच मुलाची परिपक्वता, ज्ञान आणि उपलब्ध वेळ यांची सांगड घालण्यासाठी अभ्यासक्रम, पाठ्यक्रमाचा विचार होऊ लागला. तो पाठ्क्रम विद्यार्थ्यांना शिकणे सुलभ व्हावे यासाठी साध्ये, ध्येय, उद्दिष्टे, कृति, उद्दिष्टांना महत्त्व प्राप्त झाले.मग ती उद्दिष्टे कशी लिहावीत यांचे प्रशिक्षण आवश्यक वाटू लागले. पाठ्यक्रम कसा तयार करावा, त्याची प्रतिमाने कोणती या विचाराला महत्त्व प्राप्त झाले. अध्यापन करण्यासाठी अनुदेशन पाठांची रचना महत्त्वपूर्ण वाटू लागली. कारण त्याचा अध्ययनावर व स्व-कल्पनांच्या तर्कसंगत मांडणीशी संबंध येतो. त्यासंदर्भातील विविध उपपत्त्या कोणत्या? याचा विचार येतो. अभ्यासक्रम कार्यवाही झाली की त्या संदर्भात प्रत्याभरण घेऊन त्यात सुधारणा अपेक्षित असते. कारण अभ्यासक्रम अंमलबजावणी व पूनर्रचना ह्या शिक्षणप्रक्रियेतील महत्त्वपूर्ण बाबी आहेत. याचबरोबर अभ्यासक्रम अंमलबजावणीतील शिक्षकाची भूमिका, अभ्यासक्रमावर परिणाम करणारे घटकही जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. या सर्व मुद्‌द्यांची चर्चा या पुस्तकात केली आहे. ती आपणा सर्वांना उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

संचालक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा

घटक ३ : अभ्यासक्रम

अनुक्रमणिका

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय-विवेचन

- ३.३.१ अभ्यासक्रम पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक संकल्पना
- ३.३.२ अभ्यासक्रम विकसनाची प्रतिमाने
- ३.३.३ अभ्यासक्रमाचे प्रकार व दृष्टिकोन
- ३.३.४ अभ्यासक्रम निर्मिती प्रक्रिया
- ३.३.५ अभ्यासक्रम निर्मितीवर परिणाम करणारे घटक
- ३.३.६ अभ्यासक्रम निर्मिती संदर्भ

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.६ क्षेत्रीय कार्य

३.७ संदर्भग्रंथ सूची

३.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक संकल्पना स्पष्ट करू शकाल.

* अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक यातील सहसंबंध सांगू शकाल.
* अभ्याक्रमाच्या विविध प्रतिमानाची माहिती देऊ शकाल.
* अभ्यासक्रमाचे विविध प्रकार सांगू शकाल.
* अभ्यासक्रम निर्मितीवर सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटक कसे प्रभाव पाडतात ते स्पष्ट करु शकाल.

३.२ प्रास्ताविक

शिक्षणक्षेत्रामध्ये जे अनेक महत्त्वाचे घटक सांगितले जातात त्यापैकी एक घटक म्हणजे अभ्यासक्रम होय. शिक्षणातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व विद्यापीठीय अशा कोणत्याही स्तरावरील विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिशा. अध्ययन अनुभव व विकास हा त्या स्तराच्या अभ्यासक्रमावर अवलंबून असतो. अभ्यासक्रमाची गुणवत्ता ही त्या स्तरावरील

विद्यार्थ्यांच्या प्रगतीची किंवा विकासाची गती ठरवत असते. त्यामुळे जसा अभ्यासक्रम असेल त्याप्रकारचे विद्यार्थ्यां व्यक्तिमत्त्व विकसित होते. म्हणून असे म्हटले जाते की, ''निश्चित केलेल्या उद्दिष्टांनुसार विद्यार्थ्यांच्या वर्तमान योग्य दि परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षकांच्या हातातील साधन म्हणजेच अभ्यासक्रम होय.''

आजच्या शिक्षणपद्धतीचा विचार करता, शिक्षण-पद्धतीत वेगाने होणारे बदल, शिक्षण व तंत्रज्ञानाने केलेली प्र माध्यमांचा होणारा अतिवापर व वैविध्यपूर्ण अनुभवांची सहजता याबाबी दिसून येतात. यामुळे अभ्यासक्रमाची व्यापक अधिक असणे, अभ्यासक्रम गुणवत्तापूर्ण असणे व जागतिक परिस्थितीशी जुळवून घेणारा अभ्यासक्रम असणे ही काळा गरज आहे. अभ्यासक्रम हा शिक्षण प्रक्रियेतला एक अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. जसा अभ्यासक्रम असेल तशा प्रका नागरिक तयार होतात. यामुळेच अभ्यास क्रमाची ही व्यापकता व महत्त्व लक्षात घेऊन प्रस्तुत प्रकरणात आपण अभ्याक्रमाबि अधिक माहिती अभ्यासणार आहोत.

३.३ विषय-विवेचन

३.३.१ अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक संकल्पना

३.३.१.१ अभ्यासक्रम संकल्पना

क) अर्थ : अभ्यासक्रम हा शब्द मूळ लॅटिन शब्द curriculum या शब्दापासून घेतलेला आहे. याचा अर्थ Race Cou किंवा शर्यतीचे मैदान असा होतो. ज्ञान मिळवण्याचा एक आराखडा या अर्थानेदेखील अभ्यासक्रम हा शब्द वापरला जा प्रथमतः आपण अभ्यासक्रमाच्या काही व्याख्या पाहू प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ मन्रो यांच्या मते - ''शैक्षणिक ध्येये सा करण्यासाठी शाळेत उपयोगात आणल्या जाणाऱ्या अनुभवांचा समुच्चय म्हणजे अभ्यासक्रम होय.''

मुदलियार आयोगाच्या मते - '' अभ्यासक्रम म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारे व रूढ पद्धतीने शिकविले जाणारे वि नव्हेत तर शाळेत मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या अनुभवांचा सर्वस्पर्शी व विद्यार्थ्यांचा समतोल विकास साधणारे समग्र शा जीवन म्हणजे अभ्यासक्रम होय.''

.According to Forebal - " curriculum should be conceived as an epitome of the rounded whole of knowledge and experience of human life."

* According to Bent kronenberg - "Curriculum is the systematic form of subject matter which is prepare fulfil the needs of the pupils"

* According to Taba - " A curriculum usually contains a statement of aims and specific objectives. it indic some selection and organisation of content, it either implies or manifests certain patterns of learning and teach finally it includes a programme of evaluation of the out comes."

* According to Tyler - "A curriculum can be defined as a plan for action or a written decument that inclu strategies for achieving desired goals or ends."

वरील सर्व व्याख्यावरून आपणास अभ्यासक्रमाचा व्यापक अर्थ लक्षात येतो. तसेच अभ्यासक्रमाची संकल्पनाही समज

अभ्यासक्रम म्हणजे अध्ययन अनुभव : अभ्यासक्रम ही अशी बाब आहे की ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वां विकासासाठी आवश्यक वैविध्यपूर्ण अध्ययन अनुभवांची समावेशकता असते. अभ्यासक्रमामार्फत पाठ्यपुस्तकातील शाळेतील अनुभवच दिले जात नाहीत तर शाळाबाह्य अनुभवदेखील देण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणूनच अभ्यासक्रम अध्ययन अनुभव देण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे.

अभ्यासक्रम म्हणजे शिक्षण संक्रमणाचे साधन : अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मानवी शिक्षणाची ध्येये साध्य के जातात. संस्कृतीचे जतन व भावी पिढीमध्ये संक्रमित करण्याच्या कार्याला अभ्यासक्रमामार्फत चालना व दिशा देण्यात

अभ्यासक्रम म्हणजे शैक्षणिक वातावरण : अभ्यासक्रमाच्या उपयोजनांतून तंत्रज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास केला जातो. विद्यार्थ्यांना शालेय व सहशालेय उपक्रमांची अनुभूती घेता येते. विद्यार्थी प्रगती व संपादणूक यासाठीचे आवश्यक वातावरण निर्मिती अभ्यासक्रमातूनच केली जाते.

अभ्यासक्रम म्हणजे संपूर्ण जीवन अनुभव : अभ्यासक्रमातून औपचारिक व अनौपचारिक मार्गाने वैविध्यपूर्ण अनुभव देण्याचे कार्य सातत्यपूर्ण केले जाते. मानवी जीवनाच्या सफलतेसाठी आवश्यक अनुभव अभ्यासक्रमातून प्राप्त होतात. मानवी जीवनाचा विविध अंगानी विचार व अनुभूती निश्चित करून अभ्यासक्रमाआधी मानवी ध्येये व शिक्षणाची ध्येये परिपूर्ण करतो.

ख) अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

अभ्यासक्रमाच्या वरील स्पष्टीकरणातून आपणास अभ्यासक्रमाचे काही वैशिष्ट्ये दिसून येतात, ती म्हणजे शिक्षणाची ध्येय साध्य करणारे साधन, शैक्षणिक अनुभवांचा संच, मानवी जीवनाशी संबंध, विद्यार्थी विकास साधन, जीवन संस्कृतीचा आरसा, पूर्वनियोजित आराखडा, गतिशीलता इ.

कोणत्याही अभ्यासक्रमास तात्त्विक आधार असतो. आधार याचा अर्थ पाया. अभ्याक्रमाचे तात्त्विक, मानवशास्त्रीय व समाजशास्त्रीय असे तीन आधार सांगितले जातात. अभ्यासक्रमाच्या तात्त्विक आधारासंदर्भात शिक्षणाची ध्येय कोणती असावीत? ज्ञानाचे स्वरूप काय असावे? कोणत्या प्रकारचे ज्ञान प्राप्त करावे? अशा प्रश्नांची उत्तरे मिळतात. विविध तात्त्विक दृष्टिकोनाचा व व्यक्तींच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यासक्रमावर प्रभाव व परिणाम होत असतो. यामुळे अभ्यासक्रमास व तात्त्विक अधिष्ठान प्राप्त होते.

समाजशास्त्रीय अधिष्ठानामुळे अभ्यासक्रमातून संस्कृतीचे जतन व संक्रमण करण्याची संधी उपलब्ध होते. सामाजिक तत्त्वे, सांस्कृतिक मूल्ये, मानवी संबंध अशा घटकांचा समावेश अभ्यासक्रमात होतो. मानवी समाज व समाज रचनेची जाणीव होते. तसेच मानसशास्त्रीय अधिष्ठानामुळे अध्ययन व अध्यापन प्रक्रिया, स्वरूप यास दिशा मिळते. अध्ययन अनुभव कोणत्या प्रकारचे व किती प्रमाणात दिले जावेत याची जाणीव मिळते. अध्ययन कर्त्याच्या ज्ञानाचे स्वरूप व त्याची अध्ययन प्रक्रिया योग्य दिशेने होण्यासाठीचे मार्गदर्शन प्राप्त होते. अध्ययनकर्त्याच्या विकासाचे स्वरूप, अंगे व अवस्था जाणून अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विकास योग्यरित्या करण्याची संधी प्राप्त होते. यामुळेच अभ्यासक्रम विकसन करताना या तिन्ही आधार प्रणालींचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. त्याशिवाय अभ्यासक्रम परिपूर्ण होवू शकत नाही. या तिन्ही आधारप्रणालींचा विचार केल्याशिवाय अभ्यासक्रम परिपूर्ण होवू शकत नाही.


वरील सर्व विवेचनावरून अभ्यासक्रमाची व्याप्ती अमर्यादित असते हे लक्षात येते. अभ्यासक्रमामध्ये सैद्धांतिक ज्ञानासोबतच अध्ययनकर्त्याची अभिरूची व अभियोग्यता विकसन इ.चा. समावेश होतो. अभ्यासक्रमातून अध्ययनकर्त्याच्या व्यक्तिमत्त्वाच सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विचार केलेला असतो. अभ्याक्रमात वैविध्यपूर्ण कृती व अनुभव यांची समर्पक गुंफण घातलेली असते.

अभ्यासक्रम हा राष्ट्राच्या शिक्षण प्रक्रियेचा आत्मा असतो. अभ्यासक्रमाची रचना स्तरानुसार केली जाते. म्हणजेच प्राथमिक स्तर (इ.१ ली ते ५ वी) उच्च प्राथमिक स्तर (६ वी ते ८ वी) माध्यमिक स्तर (९ वी ते १० वी) उच्च माध्यमिक स्तर (११ वी ते १२ वी) व पदव्युत्तर (२/३ वर्षे) या प्रत्येक स्तरासाठी वेगळी उद्दिष्टे ठरवली जातात व त्यानुसार अभ्यासक्रम तयार करतांना विद्यार्थ्यांचा वयोगट, अभिरुची, आवड यांचा विचार केला जातो. प्राथमिक स्तरापासून पुढे जसजसे शारीरिक वय वाढत जाते, तसतशी अभ्यासक्रमाची सखोलता वाढत जाते. अभ्यासक्रमाची ध्येये व उद्देश ठरवतांना गाभा घटक (core componots) जीवनकौशल्ये, मुल्ये, भारतीय राज्य घटनेनुसार भारतीय नागरिकांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या, राष्ट्रीय जिव्हाळ्याचे विषय (priority areas) यांचा विचार केला जातो.

ग) व्याप्ती (Scope) :

अभ्यासक्रम ही एक बहुआयामी व व्यापक संकल्पना आहे. स्तरानुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे प्रतिबिंब त्यात

असते. अभ्यासक्रमाला तात्त्विक, समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, अध्यापनशास्त्रीय व मुल्यमापनात्मक अधिष्ठाण (foundation) असते. अभ्यासक्रात शिक्षणाची ध्येये, स्तराची उद्दिष्टे, आशय, अध्ययन अनुभव, मुल्यमापन पद्धती, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे व त्या उद्दिष्टांनुसार आशय व आशयस्वरूपासाठी पोषक अध्यापन पद्धती असते. तसेच उद्दिष्टे कितपत साध्य झाली हे तपासण्यासाठी मुल्यमापन व मुल्यनिर्धारण साधने असतात. थोडक्यात अभ्यासक्रमाच्या सुधारित सैद्धांतिक आराखड्यात खालील बाबींचा विचार केला जातो.



आकृती : अभ्यासक्रम वैशिष्टे

घ) अभ्यासक्रमावर प्रभाव पाडणारे घटक :

वरील आकृतीमधील घटकांनुसार अभ्यासक्रम तयार करतांना अनेक बाबींचा विचार करावा लागतो. शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाची सध्यस्थिती, गतानुभव, संशोधन यानुसार अभ्यासक्रमावर वेगवेगळ्या घटकांचा प्रभाव पडतो. शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून आदर्शवाद, निसर्गवाद, कार्यवाद, वास्तववाद इ. चा प्रभाव पडतो. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या मानसिक गरजा, आवडनिवड, अभिरूची, स्वभाववैशिष्ट्ये, क्षमता, विकासअवस्था, आरोग्य इ. बाबींचा समावेश होतो. अभ्यासक्रमावर समाजाच्या गरजा, समाजाची गुणवैशिष्ट्ये, समाजरचना, देशाची आर्थिकस्थिती इ. चा. प्रभाव पडतो. देशाच्या राजकीय पक्षाची ध्येय, धोरणे, राजकीय तत्त्वज्ञान, देशाचा ऐतिहासिक वारसा इ. बरोबरच ज्ञानाचे स्वरूप, अध्ययन अध्यापनाचे स्वरूप याचाही प्रभाव अभ्यासक्रमावर काही प्रमाणात असतो. अस्तित्वासंबंधित अनेक प्रश्न समस्या यांचाही प्रभाव अभ्यासक्रमावर पडत असतो.

उदा. – सामाजिक समस्या

निसर्गावरील मानवी आक्रमण	ऊर्जेची समस्या, अपारंपरिक ऊर्जास्त्रोतचा वापर
ढासळती जीवनमुल्ये	ग्रामीण व शहरी जीवनातील दरी
ग्रामीण लोकांची शहरी भागाकडे ओढ	आहेरे व नाहिरे गट (गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी)
धर्म व जातीजातीमधील तणाव	वाढती गुन्हेगारी
वाढती बेकारी	लोकसंख्या वाढ

या प्रमुख दबाव गटाबरोबरच अभ्यासक्रम निर्मिती गाभाघटक, जीवनमूल्ये आणि जीवनकौशल्ये यांचाही प्रभाव असतो.

गाभा घटकांचा विचार : (Core Components)

भारतीय स्वातंत्र चळवळीचा इतिहास	संविधानात्मक जबाबदाऱ्या
राष्ट्रीय आस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय	भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा
समानतावाद धर्मनिरपेक्षता व लोकशाही	स्त्री-पुरुष समानता
पर्यावरणाचे संरक्षण	सामाजिक अडसरांचे निर्मुलन
छोट्या कुटुंबाचा आदर्श	शास्त्रीय मनोभावाची रूजवणूक

महिला व अन्य दुर्बल घटकाचे सबलीकरण
बुद्धी, भावना व कृती यांचा समन्वय
जागतिकीकरण आणि स्थानिकीकरण यांचा मेळ

मुल्य विचार (Values)

संवेदनशीलता
नीटनेटकेपणा
सौजन्यशीलता
स्त्री-पुरुष समानता
राष्ट्रभक्ती
वक्तशीरपणा
वैज्ञानिक दृष्टिकोन
श्रमप्रतिष्ठा
सर्वधर्म समभाव
राष्ट्रीय एकात्मता

जीवन कौशल्यांचा विचार (Life Skills)

स्वच्छ जाणीव (Self awaress)
समस्या निराकरण (Problem Solving)
परिणामकारक संप्रेषण (Effective Communication)
समानाभूती (Empathy)
निर्णयक्षमता (Decision making)
व्यक्ती - व्यक्ती मधील सहसंबंध (Interpersonal relations)
सृजनशील विचार (Creative thinking)
भावनांचे समायोजन (copping with emotions)
चिकित्सक विचार (Critical thinking)
ताणतणाव समायोजन (Coping with stress)

न) अभ्यासक्रमाचे घटक :

उद्दिष्टे (Objectives)
आशय (Contenl)
अध्ययन अनुभव (Learining Experinence)
मूल्यमापन (Evaluation)

उद्दिष्टे :

देशाच्या शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाचे घटक राष्ट्रीय जिव्हाळ्याचे विषय, विद्यार्थी गरजा, समाजाच्या अपेक्षा, विद्यार्थ्यांची आवड, अभिरूची, वय यांचा विचार करून स्तरानुसार शैक्षणिक उद्दिष्टे ठरवली जातात. ती उद्दिष्टे उच्चतर श्रेणीने विकसित होत गेलेली असतात.

आशय

उद्दिष्टांनुसार आशयाचे स्वरूप ठरवले जाते. उदा. भाषेमध्ये गद्य, पद्य, व्याकरण, पुरकवाचन, लेखन, संभाषण, साहित्यप्रकार इ.चा समावेश केला जातो.

अध्ययन अनुभव

बालकाच्या गरजा, बुद्धी, विचार यांना चालना देणारे अनुभव निवडले जातात. वेगवेगळे उपक्रम उदा. कार्यानुभव करा व शिका (Learning by doing), ज्ञाननिर्मिती करणाऱ्याकृती, जीवनकेंद्री अनुभव, श्रमप्रतिष्ठा कृती इ. देण्यावर भर असतो.

मूल्यमापन

उद्दिष्टे कितपत फलदायी झाली हे तपासण्यासाठी मूल्यमापन प्रक्रियेची योजना अभ्यासक्रमात असते. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (२००५) नूसार मूल्यमापन प्रक्रिया अधिक लवचीक करण्यात आली आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे. या मूल्यमापनात पाठांतरात किमान स्थान असते.

त) अभ्यासक्रमाची मूलतत्त्वे

I) माध्यमिक शिक्षण आयोगाने पुढील पाच मूलतत्त्वांचा अभ्यासक्रम विकसन विचार महत्त्वाचा सांगितला आहे.

* अनुभव समयतता
* विषय व्यापकता व लवचीकता
* सामाजिक उपयुक्तता
* फुरसदिच्या वेळेचा सद्उपयोग.
* व्यक्ती, समाज, राष्ट्र यांचेशी एकात्मता.

II) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (NCERT) अभ्यासक्रम निर्मिती संदर्भात झालेल्या राष्ट्रव्यापी चर्चेनंतर शालेय शिक्षणासाठी खालील उद्दिष्टे व कार्य सांगितली आहेत. (Curriculum for 21st century : NCERT)

सामाजिक जीवनाशी आवश्यक भाषिक योग्यता.
रोजच्या जीवनासाठी आवश्यक संप्रेषण कौशल्ये.
तार्किक बुद्धीच्या विकासासाठी गणितीय योग्यता निर्माण करणे.
रुढी, परंपरा, अंधविश्वास संपवण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास
पर्यावरणविषयक संपूर्ण माहिती
विविध विषयातील समस्यांचे परीक्षणावरुन स्वयं-मूल्यमापन करण्याची क्षमता विकसित करणे.
भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोरांचे योगदान समजणे.
मानवी मूल्यांची रुजवणूक करणे ज्यामध्ये सामाजिक, आर्थिक वैचारिक आध्यात्मिक इ. मूल्ये विकसित करणे.
देशाची सामाजिक संस्कृतिक विविधता समजणे.
राष्ट्रीय एकात्मतेसाठीचे ज्ञान आत्मसात करणे.
शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी आवश्यक ज्ञान, मनोवृत्ती, जीवनचर्चा आणि सवयींचा विकास करणे.
सुरक्षित समाजासाठी गुणवत्ता व चारित्र्यविषयक विषेश निर्माण करणे.
जीवनात सुंदरतेचा अविष्कार करणे.
लोकसंख्यावाढ थांबवण्याचे महत्त्व समजवणे.
विरुद्धलींगी व्यक्तिबद्दल आदरपूर्वक व स्वच्छ दृष्टिकोनाचा विकास करणे.

III) **राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (CNF2005) ची मुलतत्त्वे**

लोकशाही मूल्यांशी बांधिलकी
कृती व विचार स्वातंत्र्यास चालना
संवेदनशीलतेचा विकास
ज्ञाननिर्मिती प्रक्रियेस प्राधान्य
शालाबाह्य जीवनाशी सांगड
अध्ययनात घोंकपट्टी / पाठांतर यांना स्थान नाही.
मूलांच्या सर्वांगीण विकासावर भर
देशाच्या लोकशाही धोरणाशी सुसंगत राहून स्वजोपासणे
परीक्षा अधिक लवचीक व वर्गातील उपक्रमाशी एकरूप करणे.

थ) अभ्यसाक्रमाची गरज व महत्त्व

- शैक्षणिक ध्येय उद्दिष्टे पूर्ती करणेसाठी महत्त्वाचे
- समतोल व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणण्यासाठी, मानवी मूल्ये, जीवनकौशल्ये यांची रुजवणूक करणेसाठी

आवश्यक असते.

- नागरिकत्व भावना व चारित्र्य संवर्धनाकरिता आवश्यक असते.
- देशाची सामाजिक, सांस्कृतिक, विविधतता व एकात्मता जोपासण्यासाठी अभ्यासक्रमाची गरज असते.
- सुरक्षित व गुणवत्तापूर्ण समाज निर्मितीसाठी आवश्यकता असते.
- शारीरिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक, धार्मिक, व्यावसायिक, सौंदर्यानुभूती इ. गरजांची पूर्ती करण्यासंदर्भात अभ्यासक्रमाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.
- चिरंतन विकासाचे ध्येय साध्य करणेसाठी गरजेचा असतो.
- सर्जनशीलता, संशोधनवृत्ती तसेच ज्ञानपिपासू वृत्ती जोपासण्यासाठी अभ्यासक्रमाची नितांत गरज असते.

लक्षात ठेवा

जून २००६ पासून शालेय अभ्यासक्रमात (१) मूल्यशिक्षण (२) ताणतणाव व्यावस्थापन (३) उद्योजकता शिक्षण (४) मानवी हक्कांचे संरक्षण (५) भ्रष्टाचारनिर्मुलन (६) दहशतवादा विरुद्ध लढा (७) आपत्ती व्यवस्थापन इ. तत्त्वांचा समावेश केला आहे.

द) अभ्यासक्रम मर्यादा

- सैद्धांतिक तत्त्वे, व प्रत्यक्ष शालेयजीवन यांची सांगड घालण्यासाठी मर्यादा येतात.
- विद्यार्थ्यांची गरज, व्यक्ती भेद व क्षमताचा विचार कमी प्रमाणात असतो.
- मानसिक व सामाजिक विकासात मर्यादा येतात.
- सामान्य शिक्षण व विशेषशिक्षण समायोजनात मर्यादा येतात.
- सर्वच अभ्यासपुरक व अभ्यासनुवर्ती उपक्रम व कृती राबवणे सेवासुविधा मर्यादेमुळे शक्य होत नाही.
- आधुनिक अध्ययन श्रोतांची कमतरता.
- अध्ययन अनुभव देताना अध्यापक परीक्षेला जास्त महत्त्व देतात. त्यामुळे उच्चध्येये व उद्दिष्टे यांची रुजवणूक करताना अडचणी येतात.

ध) उपाययोजना

कोठारी कमिशन (१९६४-६६) ने अभ्यासक्रम राबवताना येणाऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी पुढील उपाय सुचवले आहेत.

* संशोधनाला महत्त्व द्यावे.
* शिक्षकांचे प्रशिक्षण करावे.
* प्रयोगशीलतस स्वातंत्र्य द्यावे.
* शालेय स्तरापर्यंत समान अभ्यासक्रम ठेवावा.
* उच्चस्तरावर विविधता ठेवावी.
* ग्रामीण भागासाठी शेती विषय अनिवार्य करावा.
* गणित, विज्ञान व तंत्रज्ञान विषय सक्तीचे करावे.
* समाजसेवा, शारीरिक शिक्षण, धार्मिक व नैतिक मूल्यांच्या शिक्षणासाठी अभ्यासपुरक उपक्रमांचे आयोजन करावे.
* भाषा शिक्षणात प्रथम भाषा (L1) द्वितीयभाषा (L2) व तृतीय भाषा (L3) यासाठी त्रिभाषा सुत्रीचा (Three language Formula) अवलंब करावा.

स्वयं-अध्ययन कृती :

प्रश्न १) अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये पुढील जागेत नोंदवा.

तुमच्या स्तरावरील अभ्यासक्रमाची चिकित्सा करून त्यात समाविष्ट घटक पुढीलप्रमाणे नोंदवा.

प्रश्न २) अभ्यासक्रमावर प्रभाव पाडणारे दबावगट कोणते? त्यांची यादी करा.

३.३.१.२ पाठ्यक्रम संकल्पना

पाठ्यक्रमाला इंग्रजीत Syllabus हा प्रतिशब्द वापरला जातो. पाठ्यक्रम हा अभ्यासक्रमाचा एक मर्यादित भाग असतो. पाठ्यक्रम शाळेतील एखाद्या इयत्तेसाठीच तयार केलेला असतो. दैनंदिन अध्यापन करण्याच्या दृष्टीने शिक्षकास उपयुक्त असा पाठ्यक्रम असतो. पाठ्यक्रमामध्ये विशिष्ट इयत्तेच्या, विशिष्ट विषयांच्या उद्दिष्टांचा व आशयाचाच प्रामुख्याने विचार केलेला असतो. सहशालेय उपक्रमांची फारशी दखल पाठ्यक्रमात घेतलेली नसते. पाठ्यक्रमाच्या काही व्याख्या पाहू.

व्याख्या : ''अभ्यासक्रमातील काही उद्दिष्टे ठरावीक काळात पूर्ण करण्यासाठी वर्गवातावरणात दिले जाणारे शैक्षणिक अनुभव म्हणजे पाठ्यक्रम होय.''

''विशिष्ट कालावधीत पद्धतशीरपणे विविध विषयांचा अभ्यास कसा करावा यासंबंधीचे मार्गदर्शन ज्यामध्ये दिलेले असते, त्याला पाठ्यक्रम असे म्हणतात.''

''शैक्षणिक स्तर काही इयत्तांपासून बनलेला असतो आणि अभ्यासक्रमातील शैक्षणिक उद्दिष्टे त्या त्या इयत्तांमध्ये ठरावीक प्रमाणात साध्य केलेली असतात. त्या प्रत्येक इयत्तेत जो अभ्यासक्रमाचा भाग येतो त्याला पाठ्यक्रम असे म्हणतात.''

''अभ्यासक्रमात अंतर्भूत केलेली प्रत्येक विषयाची क्रमबद्ध रचना म्हणजे पाठ्यक्रम होय.''

''विशिष्ट कालावधीत पूर्ण करण्यासाठी विषयाचा जो आराखडा असतो त्याला पाठ्यक्रम असे म्हणतात.''

"Syllabus is an out line course of a study to be completed in a fixed time."

"Syllabus is a particular course study in one subject."

"Syllabous - A plan showing the subjects or book to be studied in a particular course espeacially a course which leads to an examination."

वरील सर्व व्याख्यांवरून अभ्यासक्रमातूनच पाठ्यक्रम तयार होतो, हे लक्षात येते. दैनंदिन अध्यापनासाठी शिक्षकास पाठ्यक्रम मार्गदर्शन करीत असतो. प्रत्येक इयत्तेसाठी पाठ्यक्रम स्वतंत्र असतो.

पाठ्यपुस्तकामुळे आशयाची व्याप्ती सुस्पष्ट होते.

दैनंदिन अध्यापनात उपयुक्त शैक्षणिक साधनांची निवड करणे सहज होते.

अध्यापनासाठी आवश्यक वैविध्यपूर्ण अध्यापन पद्धती व अध्यापन कार्यनीतींच्या वापराबाबत जाणीव निर्माण होते.

आवश्यक व उपयुक्त संदर्भांची जाणीव होते.

अध्ययनाने कोणकोणती उद्दिष्टे साध्य करावयाची आहेत याचा बोध होतो.

वर्षभर कार्यान्वित केला जाणारा अभ्यासक्रम व सहशालेय उपक्रम यात योग्य संतूलन ठेवण्यास पाठ्यक्रमाची मदत होते.

पाठ्यक्रमामुळेच शिक्षकांना अध्यापनाची व विद्यार्थ्यांना अध्ययनाची दिशा प्राप्त होते.

पाठ्यक्रमाची गुणवैशिष्ट्ये

आशयात समवाय	उद्दिष्टानुगामी
स्वाध्याय समावेश	सुस्पष्ट व नेमकेपणा
मूल्यमापन मार्गदर्शन	गाभाभूत घटकांचा समावेश
प्रकल्प मार्गदर्शन	राष्ट्रीय मूल्यांचा समावेश
उपक्रम मार्गदर्शन	शिक्षकास मार्गदर्शन करणारा
	सुसूत्र आशयाची मांडणी

ख) पाठ्यक्रम स्वरूप

पाठ्यक्रमात अभ्यासक्रमाचे प्रतिबिंब असते. पाठ्यक्रमाचा संबंध ज्ञानक्षेत्राशी येतो. त्या त्या विषयातील ज्ञानाच्या स्वरूपावरून पाठ्यक्रम रचनेचे प्रतिमान ठरविले जाते. घटक उपघटकांची क्रमवार मांडणी केली जाते. विषयानुसार भारांश ठरवला जातो. उद्दिष्टानुसार महत्त्वभार ठरवला जातो. पाठ्यक्रमात अनुदेशनाविषयी माहिती, सामान्य उद्दिष्टे, विषयाची उद्दिष्टे, विषयभ्यासाचे धोरण, मूल्यमापन श्रेणी पद्धत, अध्ययन स्त्रोत, पाठ्यक्रम पूर्तता, दिनदर्शिका इ. बरोबरच पूरकवाचन, संदर्भ ग्रंथ सहशालेय उपक्रम (extra curricular activities) अडचणी, उपाय आवश्यक बाबी, (Prerequisities) इत्यादीचा समावेश होतो. पाठ्यक्रम आशयाचे संघटन, रचना व अपेक्षित अध्ययन अध्यापन प्रक्रियेद्वारे विषयातील अध्यापनात एकवाक्यता आणण्यासाठी उपयुक्त ठरतो. पाठ्यक्रमाची रचना करताना स्किनर, गॅने, ब्रुनर, डेव्हिस यांची प्रतिमाने वापरली जातात. त्याचबरोबर वेगवेगळ्या पद्धतींचा वापर केला जातो.

ग) पाठ्यक्रम रचना पद्धती (Methods Of Syllabus Designing)

*** घटक पद्धती (Unit method)**

यापद्धतीमध्ये विषयातील घटक, उपघटक यांचे क्रमवार नियोजन केले जाते. उदा इ. ११वी युवकभारती इंग्रजीमध्ये (२००९) मी, कुटुंब, शहर, समाज, देश, जग, संप्रेषण क्रांती, विश्व, जलद् वाचन इ. घटकांची क्रमवार रचना केलेली आहे.

*** समकेंद्री पद्धत (Cocentric Method)**

या पद्धतीत एकच घटक चढत्याक्रमाने मांडला जातो. उदा.पाणी

८ वी पाण्याचे गुणधर्म

७ वी पाण्याचे शुद्धीकरण

६ वी पाणी मिळवण्याचे मार्ग

वास्तव जगापासून वेगळा असू नये, अंतर्गत सुसंगती असणे आवश्यक, विद्यार्थ्याच्या वार्षिक गरजांचा विचार. अध्ययन तत्त्वांचे पालन करणारा असावा, पूर्वनियोजित वेळेत पूर्ण करता यावा, विद्यार्थी अभिरूचीचा विचार, अभ्यासेत्तर व अभ्यासपुरक उपक्रमांचे नियोजन, लवचीकतेचे सुत्र

न) पाठ्यक्रमाचे प्रकार

*** पारंपरिक पाठ्यक्रम (Traditional Syllabus):** या प्रकारात पारंपरिक अध्ययन अध्यापन व मूल्यमापनावर भर असतो. भाषेत मात्र व्याकरणावर जास्त भर दिला जातो.

*** संप्रेषणकेंद्री पाठ्यक्रम (Communication):** यामध्ये वर्गसंप्रेषण प्रक्रियेचा विचार (प्रेषक माध्यम ग्राहक) करून पाठ्यक्रम तयार केला जातो.

*** साखळीपाठ्यक्रम (Spiral):** नागमोडी रचना असलेला म्हणजे कमी अधिक उच्च निम्म पातळ्याची माळसाखळी रचना असते. यासच तार्किक पाठ्यक्रम असेही म्हणतात.

*** परिस्थितीजन्य पाठ्यक्रम (Situational):** यामध्ये अध्ययन अनुभवात जिवनकेंद्री परिस्थिती निर्माण करून शिकवण्यावर भर दिला जातो.

* **कृतीकेंद्री (Functional):** यामध्ये अनुदेशन कृती (Activity) महत्त्वाच्या मानल्या जातात.

* **प्रक्रियाकेंद्री** (Procedural): यामध्ये अध्ययन-अध्यापन ज्ञाननिर्मितीप्रक्रियेस महत्त्वाचे स्थान असते. घटकांची मांडणी प्रकल्पाच्या रूपात केली जाते.

प) पाठ्यक्रमाची गरज व महत्त्व

ब्रुमफिट सी. जे. यांनी पाठ्यक्रमाची गरज असण्याची चार कारणे सांगितले आहेत. ती म्हणजे-

* नियोजनाचे महत्त्व नाकारता येत नाही.
* अध्यापन ही रेषिय व पद्धतशीर प्रक्रिया (Liner Systematic)आहे. अध्ययन जरी रेषिय पद्धतीने घडत नसले, तरीपण अध्यापन शिस्तबद्ध असणे गरजेचे असते.
* पाठ्यक्रमाशिवाय अध्ययन अध्यापन नियंत्रित करता येणार नाही.
* शिक्षकाचे अध्यापनविचार पद्धतशीर असायला हवेत.

पाठ्यक्रम विकसन करतेवेळी विद्यार्थ्यांच्या मानसिक गरजांना महत्त्व द्यावे. शिक्षकांनी पाठ्यक्रम योग्यवेळेत पूर्ण होईल याचे भान ठेवावे. पाठ्यक्रम जीवन व व्यवहारज्ञान यांची सांगड घालून तयार करणे अपेक्षित असते. तो अभ्यासक्रमाला अनुसरून असावा. थोडक्यात पाठ्यक्रम हा अभ्यासक्रमाचाच एक भाग (Portion) असतो हे आता आपल्या लक्षात आले असेलच.

फ) अभ्यासक्रम व पाठ्यक्रम फरक

अभ्यासक्रम (Curriculum)	पाठ्यक्रम (Syllabus)
१) अभ्यासक्रम ही व्यापक संकल्पना आहे यामध्ये व्यक्तिमत्त्व विकासाच्या सर्व अंगाचा विचार असतो.	१) पाठ्यक्रम हा मर्यादित असतो व अभ्यासक्रमनुसार तयार केला जातो.
२) अभ्यासक्रम हा स्तरानुसार असतो उदा. प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक स्तर इ.	२) पाठ्यक्रम हा इयत्तेनुसार व विषयानुसार असतो. उदा. ४ थी, ५वी, ६वी, ७वी, ८वी,
३) देशाच्या शिक्षण प्रणालीत सामान्य ध्येये व उद्दिष्टे यांचा समावेश असतो.	३) पाठ्यक्रमात अध्ययन अध्यापनाची तत्त्वे प्राणली यांचा समावेश असतो.
४) अभ्यासक्रमात स्तरानुसार सर्व विषयांची क्रमबद्ध मांडणी असते.	४) पाठ्यक्रमात विषयातील घटक उपघटानुसार तपशील दिलेला असतो.
५) अभ्यासक्रमात क्षमातांचा स्थूल विचार असतो.	५) पाठ्यक्रम विद्यार्थ्यांच्या भाषिक, मानसिक, बौद्धिक क्षमतांचे मुर्त स्वरूप असते.
६) विद्यार्थ्यांच्या वर्तनबदलाचे स्वरूप व विशेष उद्दिष्टे दिलेली नसतात.	६) विशिष्ट उद्दिष्टे व विषय घटक यानुसार अध्ययन निष्पती दिलेल्या असतात.
७) अभ्यासक्रम हा शालेय जीवनाचा स्थूल आराखडा असतो.	७) पाठ्यक्रम हा शालेय जीवनाच्या वेगवेगळ्या अंगाचा सूक्ष्म आराखडा असतो.

थोडक्यात अभ्यासक्रमात स्तरानुसार विषय शिकवण्याचे सामान्य हेतू दिलेले असतात. तर पाठ्यक्रमात इयत्तानुरूप उद्दिष्टये, विशिष्ट विषयासाठी महत्त्वाच्या पद्धती, अध्यापन तंत्रे, अनुरूप साधने, मूल्यमापन तंत्रे, यांचे सविस्तर विवेचन असते. महाराष्ट्र राज्यात इ. १ ली ते ८ वीपर्यंत अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ तयार करते. इ. ९वी ते १२ वीपर्यंतचा अभ्यासक्रम व पाठ्यक्रम महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ करत असते. पूर्वी अभ्यासक्रम व पाठ्यक्रम स्वतंत्रपणे छापला जात असे. सध्या दोन्हीही संकल्पना एकत्रित पुस्तकरूपाने छापल्या जातात. अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तक यांच्यात घनिष्ट संबंध असतो. उदा. पाठ्यक्रमात इयत्तेनुसार उद्दिष्टे दिलेली असतीलच असे नाही. त्याकरिता अभ्यासक्रम पहावा लागतो. पाठ्यक्रमातील तत्त्वे (Facts), संकल्पना (Concepts), नियम (Rules), तत्त्वे (Principles) व आशयाचे स्वरूप पहावयाचे असेल तर पाठ्यपुस्तकाची

मदत घ्यावी. अशा प्रकारे या तिन्ही संकल्पनामध्ये निकटचा संबंध आहे.

३.३.१.३ पाठयपुस्तक संकल्पना

क) अर्थ

पाठ्यपुस्तक हा शब्द इंग्रजीतील Text book या शब्दाला मराठी पर्यायी शब्द म्हणून वापरला जातो. इंग्रजी शब्द कोषामध्ये Text book या शब्दाचा अर्थ '' Manual of instruction standard book in a branch of Study- oxford dictionary''

शिक्षण प्रक्रियेमध्ये अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांना जितके महत्त्व आहे तितकेच पाठ्यपुस्तकासही महत्त्व आहे. पाठ्यपुस्तक हे विद्यार्थी, शिक्षक व पालक या सर्वांना मार्गदर्शन करते तसेच उपयुक्तही असते. पाठ्यपुस्तकाचा मुख्य हेतू हा विद्यार्थ्यांस अध्ययन करण्यास सहाय्य करणे हा आहे. प्रथमत: आपण पाठ्यपुस्तकाच्या काही व्याख्या पाहू.

'' नेमून दिलेला अभ्यासाचा भाग ज्यात दिलेला आहे, अभ्यास करण्यासाठी ज्या पुस्तकाचा वापर करता येतो. ज्या पुस्तकाचा विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी आवश्यक असणारा पाठ्यांश वाचावयास मिळतो, अशा पुस्तकांना पाठ्यपुस्तक असे म्हणतात.''

'' ज्या पुस्तकात विद्यार्थ्यांना आवश्यक असणारा पाठ्यांश मिळतो, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना स्वत:चे मूल्यमापन करण्यासाठी स्वाध्याय दिलेले असतात त्यास ' पाठ्यपुस्तक' असे म्हणतात.

'' पाठ्यक्रमातील उद्दिष्टये प्राप्त करण्यासाठी तज्ञांनी विशिष्ट प्रक्रियेनूसार तयार केलेले लिखित साधन म्हणजे पाठ्यपुस्तक होय.''

According to Keating- " Textbook is half of apparatus of teaching."
According to C.P Hill- " Text book ought not to be used as a collection of facts to be learnt by heart but rather as store house of basic information which the pupils can use in variety of active ways."

वरील सर्व व्याख्यांवरून हे लक्षात येते की, पाठ्यपुस्तक हे ज्ञान संपादनाचे एक साधन, शैक्षणिक साहित्य, सत्याचा अर्थ लावणारे माध्यम, मार्गदर्शक संदर्भ आणि विद्यार्थ्यांना अध्ययनास प्रोत्साहित करणारे स्त्रोत आहे. यावरून पाठ्यपुस्तक म्हणजे '' एखाद्या अधिकृत प्राधिकरणाने नेमून दिलेला पाठ्यक्रम अत्यंत नेमकेपणाने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शिक्षकांना व पाठ्यक्रमातील पाठ्यांश नेमकेपणाने अध्ययन करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करणारे साधन होय.''

कोणत्याही पाठ्यपुस्तकाची निर्मिती करताना ते निव्वळ माहितीचे एकत्रिकरण होणार नाही याची काळजी घेतलेली असते. पाठ्यपुस्तकात खालील वैशिष्ट्यांचा विचार प्रामुख्याने केलेला असतो.

विद्यार्थ्यांचे सरासरी वय व परिपक्वतेचा विचार केलेला असतो.

विद्यार्थी वयानुसार भाषा, मजकुर, उदाहरणे, चित्रे, आकृत्या व स्वाध्याय यांचा समावेश केलेला असतो.

अध्यापन सूत्रांचा विचार केलेला असतो.

उपाययोजन, सराव व दृष्टिकोन या तत्वांचा विचार केलेला असतो.

आशयाची मांडणी करताना मानसशास्त्रीय तत्त्वांचा वापर केलेला असतो.

पाठ्यपुस्तक हे पाठ्यक्रमाच्या उददिष्टानुसार लिहिले जाते व पाठ्यक्रम अभ्यासक्रमाच्या हेतूनुसार तयार केला जातो. म्हणून पाठ्यपुस्तकास अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांचा आरसा असे म्हटले जाते. शालेय अध्ययन व अध्यापनावर पाठ्यपुस्तकाचा मोठा प्रभाव असतो. शिक्षक व विद्यार्थी यांना आपले अध्यापन-अध्ययन कार्य सुलभ होते. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाला व शिक्षकाच्या अध्यापनाला पाठ्यपुस्तकामुळे दिशा मिळते. शिक्षण म्हणजे पुस्तकातील आशय शिकणे आणि परीक्षा देणे अशा प्रकारचा समज होता कामा नये. पुस्तक आणि शिक्षक यात यांत्रिकता नको. पुस्तक हे शिक्षकाचे एक साधन (Tools) असून साध्य (अंतिम ध्येय) नव्हे हे लक्षात घेतले पाहिजे. पुस्तक केंद्री अध्यापन, पुस्तककेंद्री अध्ययन या बाबीतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होत नाही. त्यामुळे पुस्तकाकडे एक अध्ययन साहित्य म्हणूनच पहायला हवे.

ख) पाठ्यपुस्तक रचना

पाठ्यपुस्तकात पाठ्यक्रमातील उद्दिष्टानुसार आशयची क्रमवार मांडणी केलेली असते. उदा. गद्य, पद्य, लेखन,

व्याकरण, पुरक वाचन इ. आशयाची निवड करताना आशयाची उपयुक्तता,विद्यार्थ्यांचे वय व अभिरूचीकेंद्री आशय निवडला जातो. उदा. इ. १ली ते ५वीच्या मराठीसाठी पदय निवडतांना बडबडगीते, प्रार्थना नर्सरीराईम्स, निसर्ग कविता यांची निवड केली जाते. तर माध्यमिक स्तरासाठी पद्य निवडताना सामाजिक, वैयक्तिक, राष्ट्रीय मूल्ये असलेल्या कवितांची निवड केली जाते. पाठ्यपुस्तकातील आशय निवडताना बालमानशास्त्राचा अभ्यास असणारे ज्यांचे भाषेवर प्रभुत्त्व व पुरेसा अनुभव आहे असे शिक्षक आशयनिवड समितीत असतात. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF 2005) नुसार पाठ्यपुस्तकाची रचना ज्ञानसंरचनावादी तत्त्वज्ञान स्वीकाल्यामुळे ज्ञाननिर्मिती प्रक्रियेश चालणा देणारा कृतियुक्त आशच सर्वच विषयात निवडण्यावर भर दिलेला आढळतो. पाठ्यपुस्तक निर्मितीत पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळांना राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संसोधन व प्रशिक्षण परिषद मदत करतात. काही राज्यात व केंद्रशासित प्रदेशात एन.सी.ई आर.टी.ची पुस्तके वापरली जातात. कर्नाटक व गुजरातमध्ये पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी स्वतंत्र संचलनालय आहे. महाराष्ट्र राज्यात पाठ्यपुस्तक मंडळाकडून ना नफा ना तोटा या तत्त्वानुसार ७ ते ८ करोड पुस्तके छापली जातात. याकरिता मंडळाने ९ उपकेंद्र स्थापन केलेले असून १५० प्रिंटीगप्रेसद्वारे छपाईचे कार्य केले जाते. वितरणासाठी राज्यात १२०० रिटेल डिलर्स नेमले आहेत. प्रत्येक विषयाच्या पाठ्यपुस्तकातील आशयाचे स्वरूप त्या त्या विद्याशाखेनुसार भिन्न असते. मराठी विषय पाठ्यपुस्तकाच्या आशयाचे स्वरूप उदाहरणादाखल पुढे दिले आहे.

गद्य	संज्ञा	व्याख्या	प्रक्रिया
पद्य	संकल्पना	सुत्र	वाकप्रचार
व्याकरण	तत्त्व	स्पष्टीकरण	म्हणी
वाचन	नियम	मध्यवर्ती	कल्पना घटना
भाषण	तथ्ये	संरचना	सहसंबंध
संभाषण	माहिती	गुणधर्म	कार्यकारण भाव
श्रवण	सिद्धांत	कौशल्ये	कृतिनिरीक्षण
कला	चर्चा	चित्रे	कार्य निरिक्षण
संवाद	सामाजिक,	आशयनाटक	स्वाध्याय
रसास्वाद	इतर	कादंबरी	उपक्रम

तक्ता क्र: मराठी विषय पाठ्यपुस्तकातील आशयाचे स्वरूप

ग) विषयवस्तू निवडीची तत्त्वे

पाठ्यपुस्तकातील आशय निवडतांना काही तत्त्वांचा विचार केला जातो. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील निवडलेला पाठ्यआशय हा–

१) कृतीक्रेंदी २) अनुभवकेंद्री ३) अभिरूचीक्रेंदी ४) जीवनकेंद्री ५) उपयुक्त ६) विद्यार्थी गरजाधिष्ठित ७) उद्दिष्टांचा विचार करणारा ८) सामान्य व विशेष शिक्षणाचा विचार असणारा ९) सर्जनशीलतेला चालना देणारा १०) समग्र ११) भविष्याचा विचार असणारा १२) व्यक्तिभेदाचा विचार करणारा १३) गाभाघटक, जीवन मूल्ये कौशल्ये यांचा समावेश असणारा १४) संवेदनशीलता १५) बौद्धिक कुवतीचा विचार १५) अध्यापन सुत्रांचा वापर असणारा १६) स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प, उदाहरणे, प्रपाठ, शै. पूरक साहित्य यांची सुलभता असणारा १७) टाइपिंग, बांधणी, छपाई, रंग, चित्रे, बाह्यांग व अंतरंग आकर्षक असणारा १८) पाठाची संख्या, पानांची संख्या, किंमत यांचा विचार करणारा १९) मूल्यमापन व परीक्षा यांचा विचार करणारा इ. तत्त्वांचा विचार पाठ्यवस्तूची निवड करताना करावा लागतो.

घ) पाठ्यपुस्तकांचे प्रकार

* **इ–बुक:** २१ व्या शतकातील डिजिटल क्रांतीमुळे या प्रकारची पुस्तके आयफोन, गॅझेट, ॲमेझॉन व इतर प्रकाशनाद्वारे प्रकाशित केली जातात. हार्डबाऊंड, छपाई रूपातील पुस्तकांपेक्षा ही पुस्तके अत्यंत स्वस्त असल्याने विद्यार्थी व शिक्षक अशा पुस्तकांची मागणी करतात.

*** मुक्तपुस्तक (Open books)**

ही पुस्तके मोफत वापरता येतात. या प्रकारातील पुस्तके आकर्षक व अभिरूचीपूर्ण असतात. एम. आय.टी. व हॉवर्ड इ. परदेशातील शिक्षणसंस्थामध्ये मुक्त पुस्तकांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. मुक्त पुस्तकांची सुरुवात फ्लॅटवर्ल्ड कॉलेज या कंपनीने केली. या कंपनीच्या पुस्तकांचा वापर जगातील ४४ देशांत केला जातो.

के-१२ पाठ्यपुस्तके

अमेरिकेतील अनेक शाळा व महाविद्यालयात अशा प्रकारची पुस्तके वापरली जातात या पुस्तकांची निर्मिती करताना विद्यार्थी व शिक्षकांचे लोकशाही पद्धतीने मतदान घेऊन स्थानिक शाळा, लोकल बोर्ड, शिक्षणविभाग इ. के-१२ बुक्सला पसंती दर्शवतात.

*** रेग्युलर पाठ्यपुस्तके**

संस्था/विद्यापीठ/ शासनाच्या नियमांचे पालन करून पाठ्यक्रमाचा विचार करून तयार केलेले मुद्रित स्वरूपातील पाठ्यपुस्तक. उदा. महाराष्ट्रात पाठ्यपुस्तक मंडळ व SCERT -ने मिळून प्राथमिक शिक्षण व डी. आणि महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळ -माध्यमिक स्तरावरील पुस्तकांची छपाई करते. मुक्त विद्यापीठे आपल्या शिक्षणक्रमांसंदर्भात अभ्यासक्रमनिहाय पाठ्यपुस्तके विकसित करून त्याची छपाई करते.

न) पाठ्यपुस्तक चिकित्सा

पाठ्यपुस्तकाची रचना, उपयुक्तता, चांगल्या बाबी, उणिवा व विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण होण्यासाठी आकर्षक रचनाघटक, उपघटक यांची तर्कसंगत मांडणी, अभ्यासक्रम व पाठ्यक्रमातील तत्त्वांशी सुसंगता इ.च्या आधारे पाठ्यपुस्तक चिकित्सा करता येते. कोणत्याही इयत्तेचे पाठ्यपुस्तक प्रत्यक्ष वर्गात शिकवताना त्यातील उणिवा शिक्षकाच्या लक्षात येतात या त्रुटी दूर करण्यासाठी शिक्षक काय करू शकेल? अध्यापनपद्धती, तंत्रे कशी वापरेल? कोणत्या सुधारणा करेल? यांचाही विचार केला जातो. थोडक्यात आपण जो आशय वर्गात शिकवणार त्याचा सखोल अभ्यास अध्यापकाला करावा लागतो. पाठ्यपुस्तकाच्या चिकित्सेसाठी अंतरंग व बाह्यांग यावरून काही निकष ठरवावे लागतात. प्रामुख्याने शैक्षणिक बाबी व तांत्रिक बाबी विचारात घ्याव्या लागतात. पुस्तक छपाईपूर्वी विचारात घ्यावयाचे घटक

बाह्यरंग	अंतरंग
मुखपृष्ठ, शिर्षक, मलपृष्ट लेखन, बांधणी स्वाध्याय, छपाई, पृष्ठसंख्या, टाईप, फाँट साईज, कागद गुणवत्ता, पाने, आकार, चित्रे, आकृत्या, किंमत इत्यादी	अभ्यासक्रम, पाठ्यक्रमातील ध्येय, उद्दिष्टे, आशयमांडणी, घटक, उपघटक मांडणी, गाभा घटक, मूल्ये, कौशल्यांचा विचार, पूर्वज्ञान, अध्ययन सूत्रे, विद्यार्थी अभिरूची व वय, स्वाध्याय, मूल्यमापन इत्यादी.

३.३.१.४ अभ्यासक्रम पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक सहसंबंध

राष्ट्राच्या शैक्षणिक ध्येय धोरणानुसार व स्तरानुसार
अभ्यासक्रमाची निर्मिती केली जाते
अभ्यासक्रमानुसार इयत्तावर पाठ्यक्रमाची रचना केली जाते.
पाठ्यक्रमानुसार विषयावर पाठ्यपुस्तके तयार केले जाते.

	अभ्यासक्रम (Curriculum)	पाठ्यक्रम (Syllabus)	पाठ्यपुस्तक (Textbook)
अर्थ (meaning)	विद्यार्थ्यांचा परिपूर्ण विकास (बोधात्मक, भावात्मक, क्रियात्मक)	विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील उत्तरदायित्व दर्शवणारे विषयवार	अनुदेशनविषयक संघटित आशय म्हणजे पाठ्यपुस्तक

	करणारे संपूर्ण शालेयजीवन म्हणजे अभ्यासक्रम	बोधात्मक नियोजन म्हणजे पाठ्यक्रम	
हेतु	विद्यार्थी विकासासाठी राष्ट्राच्या शै-धोरणाशी सुसंगत निर्णय क्षमतेसाठी मार्गदर्शन करणे	इयत्ता व विषयवर आशयाची व्याप्ती ठरवणे व परीक्षाविषयक मार्गदर्शन करणे	पाठ्यक्रमानुसार उद्दिष्टांनुसार आशय(मजकूर) पुरवणे
आशय (Content)	शिक्षण क्रमातील सर्वविषय अभ्यासपुरक, अभ्यासेतर उपक्रम मूल्यमापन योजना ध्येये-गाभा घटक आणि जीवन मूल्ये	विषयाची उद्दिष्टे अध्ययन अध्यापन विषयक तत्त्वे आशयाचे स्वरूप इ.	निर्देशनात्मक प्रक्रियात्मक ज्ञानासाठीचा आशय (मजकूर)

थोडक्यात अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध आहे. अभ्यासक्रमात शैक्षणिक ध्येये, मूल्ये, जीवनकौशल्ये यानुसार सामान्य उद्दिष्टे दिलेली असतात. सामान्य उद्दिष्टानुसार पाठ्यक्रमात विषयाचे स्वरूप स्पष्ट होते. पाठ्यक्रमानुसार पाठ्यपुस्तक तयार केली जातात. पाठ्यपुस्तकात वर्गअध्यापनाची उद्दिष्टे (Classroom Objectives) असतात. पाठ्यपुस्तकात वेगवेगळे घटक उपघटक असतात. घटक उपघटकातील आशयाचे स्वरूप वेगळे असते. आशय शिकवण्याची व शिकण्याची विशेष उद्दिष्टे असतात. अध्यापकास अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक यांच्यातील उतरंड समजणे आवश्यक असते. पाठ्यपुस्तक हे अध्यापनाचे साधन (Tool) आहे, साध्य नाही. पुस्तक म्हणजे सर्वकाही अशी आपली धारणा असते. पुस्तक व परीक्षाकेंद्री अध्यापन केल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात अडथळे येतात. पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून जीवनमूल्ये, जीवनकौशल्ये जातात.

३.३.२ अभ्यासक्रम विकसित प्रतिष्ठाने –

I) हिल्डा टाबाचे सामाजिक अध्ययन यांचे प्रतिमान (HTSS Model)

हिल्डा टाबा यांनी मांडलेले प्रतिमान ' मूलभूत प्रतिमान' म्हणून ओळखले जाते. त्यांच्या मते ' अभ्यासक्रम विकसनामध्ये शिक्षकांचा सहभाग घेतला पाहिजे' हिल्डा टाबा यांच्या प्रतिमानुसार सर्व अभ्यासक्रम अनुदेहातिय घटकांमध्ये तयार केला जातो. हिल्डा टाबा यांच्या प्रतिमानुसार अभ्यासक्रम विकसनाच्या पायऱ्या सांगितलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे

गरजांचे निदान : अभ्यासक्रम रचनेच्या या पायरीमध्ये अभ्यासक्रम नियोजन करणारे तज्ज्ञ व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या अध्ययन गरजांचा शोध घेणे अपेक्षित आहे. यासाठी शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधणे महत्त्वाचे असते.

उद्दिष्टांची निश्चिती : या पायरीवर शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार उद्दिष्टांची निश्चिती करावी. यासाठी गरजांचे स्वरूप लक्षात घेऊन त्याचे वर्गीकरण करणे अपेक्षित आहे.

आशयाची निवड : या पायरीमध्ये शिक्षकांनी पूर्वनिश्चित उद्दिष्टांना अनुसरून आशयाची निवड करावी. निवड केलेला आशय उपयुक्त व सप्रमाण असावा.

आशयाचे संघटन : अध्ययनार्थीची पक्वता, शैक्षणिक गुणवत्ता, आवड यांच्या आधारावर निवडलेल्या आशयाची क्रमबद्ध मांडणी करावी.

अध्ययन अनुभवांची निवड : या पायरीवर आशयाला अनुसरून अध्ययन अनुभवांची निवड शिक्षकांनी करावी. ही निवड करताना अध्ययनार्थी व आशय यामध्ये जास्तीतजास्त आंतरक्रिया होणे आवश्यक आहे.

अध्ययन कृतींचे संघटन : शिक्षकाने आशयाच्या रचनेनुसार अध्ययन कृतींची रचना करावी.

मूल्यमापन साधने : पायरी क्र. दोनमध्ये निश्चित केलेली उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली ? हे ठरविण्यासाठी मूल्यमापनाची साधने ठरवावीत.

वरील अभ्यासक्रम रचना शिक्षकांनी करावी असे मत हिल्डा टाबा यांनी मांडलेले आहे. या अभ्यासक्रमाची वरील पायऱ्यानुसार रचना झाल्यानंतर त्याची वैधता व सप्रमाणता ठरविण्यासाठी खालील पाच टप्पांचा वापर करावा.

पथदर्शी घटकाची निर्मिती-

* गरजांचे निदान
* उद्दिष्टांची निश्चिती
* आशयाची निवड
* आशयाचे संघटन
* अध्ययन अनुभवांची निवड
* अध्ययन कृतीचे संघटन
* मूल्यमापन साधने

वैधता निश्चितीसाठी घटकांचे प्रायोगिक परीक्षण

* पूनर्रचना व संकलन
* आराखडा विकसन
* नवीन घटकांची रचना

अभ्यासक्रम रचनेमध्ये प्रशासन, शाळेतील पर्यवेक्षक, शिक्षक विद्यार्थी व समाजातील लोकांचा सहभाग असतो. हिल्डा टाबा यांच्या प्रतिमानुसार अभ्यासक्रम विकसनाची प्राथमिक जबाबदारी शिक्षकांची आहे.

II टेलर यांचे अभ्यासक्रम विकसनाचे प्रतिमान

सल्फ टेलर यांनी 'Basic Principles of curriculum and Instruction' या ग्रंथामध्ये अभ्यासक्रम विकसनाचे प्रतिमान मांडले आहे. टेलर यांनी इ.स. १९४० साली मांडलेले प्रतिमान आजही तितकेच प्रसिद्ध आहे. हे प्रतिमान चार पायऱ्यांचे आहे.

प्रतिमानाच्या पायऱ्या

i) शाळेची उद्दिष्टे
ii) उद्दिष्टांशी निगडित शैक्षणिक अनुभव
iii) अनुभवांचे संघटन
iv) उद्दिष्टांचे मूल्यमापन

शाळेची उद्दिष्टे

टेलर यांच्या मते, अभ्यासक्रम नियोजन करणाऱ्या तज्ञांनी सर्वप्रथम सर्वसामान्य उद्दिष्टे निश्चित करावीत. यासाठी खालील स्त्रोत उपयुक्त ठरतील.

i) अभ्यासाचा आशय
ii) अध्ययनार्थी
iii) समाज

या उद्दिष्टांच्या निश्चितीनंतर अभ्यासक्रम नियोजन करणाऱ्या तज्ज्ञांनी यांचे परीक्षण करून त्याचे शाळेचे तत्त्वज्ञान, अध्ययनार्थ्यांचे मानसशास्त्र असे दोन भागात वर्गीकरण करावे. यानंतर तज्ज्ञांच्या मदतीने विशिष्ट अनुदेशनीय उद्दिष्टांची मांडणी करावी.

ii) उद्दिष्टांशी निगडित शैक्षणिक अनुभव

अभ्यासक्रम तज्ज्ञांनी अनुदेशीय उद्दिष्टांना अनुसरून अध्ययन अनुभवांची निश्चिती करावी. त्यानुसार अध्ययनार्थ्याला सदर उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक ते अध्ययन अनुभव द्यावेत.

iii) अध्ययन अनुभवांचे संघटन

टेलर यांच्या मते, या पायरीवर अभ्यासक्रम नियोजन तज्ज्ञांनी अध्ययन अनुभवांचा क्रम निश्चित करावा. त्यानंतर या अध्ययन अनुभवांची मांडणी करावी. विविध कल्पना, मूल्ये व कौशल्य यांचे अर्थपूर्ण अध्ययनासाठी अध्ययन अनुभवांची रचना करावी.

iv) उद्दिष्टांचे मूल्यमापन

या शेवटच्या पायरीवर नियोजनकर्त्यांनी दिलेल्या अध्ययन अनुभवांनी अपेक्षित उद्दिष्टे साध्य होतात का ते तपासून पाहावे. यात मूल्यमापनातून केलेली ही अभ्यासक्रम रचना उपयुक्त आहे की, नाही हे ठरविता येते.

टेलर यांनी मांडलेले अभ्यासक्रम रचनेचे प्रतिमान सोपे असून याचा वापर मोठ्या प्रमाणात केला गेला. आजही अभ्यासक्रम रचना करताना या प्रतिमानातील पायऱ्यांचा वापर केलेला दिसून येतो.

३.३.३ अभ्यासक्रमाचे प्रकार व दृष्टिकोन –

अभ्यासक्रम दृष्टिकोनात आपण नेमके कोणासाठी अभ्यासक्रम तयार करत आहोत? अभ्यासक्रमात आपणास नेमक्या कोणत्या घटकावर भर द्यावयाचा आहे? अभ्यासक्रम विकसनात केंद्रस्थानी कशास ठेवले जाणार आहे? म्हणजेच अभ्यासक्रमाची संरचना प्रमुख कोणत्या तत्त्वांवर आधारलेली आहे? याचा विचार केला जातो. त्यानुसार अभ्यासक्रम दृष्टिकोनाचे खालील प्रमुख प्रकार सांगितले जातात.

३.३.३.१) आशयानधिष्ठित किंवा विषयकेंद्रित अभ्यासक्रम

३.३.३.२) वर्तनवादी अभ्यासक्रम

३.३.३.३) क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम

३.३.३.४) ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम

३.३.३.५) विद्यार्थीकेंद्रित अभ्यासक्रम

यापैकी आपण विषयकेंद्रित, क्षमताधिष्ठित व ज्ञानरचनावादी अशा चार अभ्यासक्रम दृष्टिकोनाचा विचार करणार आहोत.

३.३.३.१ क) विषयकेंद्रित अभ्यासक्रम दृष्टिकोन

क) अर्थ

विषयकेंद्रित अभ्यासक्रम हा सर्वात जूना अभ्यासक्रम दृष्टिकोन असेही म्हटले जाते. विषयकेंद्रित अभ्यासक्रम दृष्टिकोनात विषयांना अत्यंत महत्त्व असते. हा पारंपरिक दृष्टिकोन आहे. या दृष्टिकोनात ज्ञानसंपन्नतेलाही महत्त्व असते. विषयकेंद्रित अभ्यासक्रमात वैविध्यपूर्ण व आवश्यक विषयांचा समावेश केलेला असतो. हे विषय किंवा आशयाचा समावेश करताना विद्यार्थ्यांच्या वयाचा, अध्ययन क्षमतांचा व परिपक्वतेचा विचार केलेला असतो. विषयकेंद्रित अभ्यासक्रम दृष्टिकोन हा खालील गृहीतकांवर आधारलेला असतो.

ख) गृहीतके –

. अभ्यासक्रमामार्फत सांस्कृतिक ज्ञानाचे संक्रमण एका पिढिकडून पुढिल पिढीकडे केले जाते.

. वेगवेगळ्या विषयांच्या अध्ययनातून ज्ञान संपन्न होते.

. वैश्विक ज्ञान हे अफाट असून त्याचे वर्गीकरण समर्पक विषयांमध्ये केल्यास आकलन सहज होते.

. प्रत्येक विषयाचे सादरीकरण किंवा मांडणी ही क्रमबद्ध असणे आवश्यक असते.

. कोणत्याही विषयाचे आकलन हे योग्य घटक मांडणी व समर्पक शाखांमार्फत होत असते.

ग) विषयकेंद्रित अभ्यासक्रम वैशिष्टे : विषयकेंद्रित अभ्यासक्रम दृष्टिकोनाची खालील वैशिष्ट्ये सांगितली जातात.

विषयास सर्वाधिक महत्त्व : अभ्यासक्रमामध्ये विविध विषयांचा समावेश असतो. या विषयांमार्फत विद्यार्थ्यांपर्यंत माहितीचे संक्रमण केले जाते व यातून विद्यार्थी ज्ञानसंपन्न हेतो अशी अपेक्षा असते.

विद्यार्थी गरजांना महत्त्व कमी : प्रस्तूत अभ्यासक्रम दृष्टिकोनात आशय संपादनावर भर देण्यात आलेला असल्याने विद्यार्थ्यांच्या गरजा, इच्छा, आवड, वृत्ती किंवा बौद्धिक क्षमता या बाबींचा विचार कमी प्रमाणात केला जातो. विद्यार्थ्यांनी विषयाचे अधिक आकलन करून यश संपादन करावे अशी अपेक्षा केली जाते.

परीक्षा केंद्रित अध्ययन–अध्यापन प्रक्रिया : या अभ्यासक्रम दृष्टिकोनात परीक्षेस खूप महत्त्व असते. विद्यार्थ्यांने परीक्षेस विविध विषयांना दिलेला प्रतिसाद पाहून त्या विद्यार्थ्यांची प्रगती निश्चित केली जाते. ज्या विद्यार्थ्यांने परीक्षेत चांगला प्रतिसाद दिला असेल तो विद्यार्थी अधिक यशस्वी असे समजले जाते. यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया ही पूर्णपणे परीक्षा डोळ्यासमोर ठेवूनच केली जाते. विद्यार्थ्याना परीक्षेसाठी तयार करणे हा त्यामागचा प्रमुख उद्देश असतो. यामुळे विषयकेंद्रित अभ्यासक्रम दृष्टिकोनात पाठ्यपुस्तकांना व परीक्षांना केंद्रबिंदू मानले जाते व विद्यार्थी गरजा मात्र दुर्लक्षित होतात.

शिक्षक भूमिकेस अधिक महत्व : या अभ्यासक्रम दृष्टिकोनात शिक्षकाला अवास्तव महत्त्व देण्यात आले आहे. शिक्षकांशिवाय विद्यार्थी अध्ययन करूच शकत नाहीत असे गृहीतक मान्य केले आहे. म्हणजेच अध्ययनापेक्षा अध्यापनास अधिक महत्त्व देण्यात आले आहे.

विषयज्ञान अभिवृद्धिकडे लक्ष केंद्रित : या अभ्यासक्रमाअंतर्गत कोणतोही उपक्रम, कार्यक्रम किंवा कृती विद्यार्थ्यांचे विज्ञानज्ञान समृद्ध व्हावे यासाठीच आयोजित केली जाते. यामध्ये वर्गनिर्बंध, स्वाध्याय, प्रकल्प, संगणक वापर, ग्रंथांचे वाचन इत्यादींचा समावेश होतो.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत भेदाकडे दुर्लक्ष : अभ्यासक्रम अनुभवणारे अनेक विद्यार्थी आहेत व त्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये विविधता किंवा भेद असतात. यामध्ये बौद्धिक, मानसिक, भावनिक, भाषा, वृत्ती, अभिरूची, सामाजिक, शारीरिक व आर्थिक भेद असू शकतात अशी अपेक्षा ठेवली जाते.

घ) विषयकेंद्रित अभ्यासक्रम दृष्टिकोनात शिक्षकाची भूमिका :

. या अभ्यासक्रम विकसनात शिक्षकाची प्रमुख भूमिका महत्त्वाची असते.

. अभ्यासक्रमात कोणकोणत्या विषयांचा समावेश करणे योग्य राहील हे शिक्षकास ठरवावे लागते.

. विषयांमधील माहिती विद्यार्थ्यांप्रत पोहोचवण्यासाठी अध्यापन पद्धतींची निवड व अध्ययन अनुभव विकसन करण्याची जबाबदारी शिक्षकाची असते.

. विद्यार्थ्यांचे आशयज्ञान समृद्ध होण्यासाठी अध्ययन स्त्रोतांचा वापर कसा करावयाचा याचे मार्गदर्शन शिक्षकास द्यावे लागते.

. विद्यार्थ्यांच्या आशयज्ञानातील प्रगती पाहण्यासाठी विविध प्रकारच्या परीक्षांचे आयोजन करावे लागते.

३.३.३.२ वर्तनवादी अभ्यासक्रम दृष्टिकोन

मानसशास्त्रातील वर्तनवादी विचारसरणीवर हा अभ्यासक्रम आधारलेला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वर्तनात बदल करणे या उद्देशाने हा अभ्यासक्रम तयार केला जातो. विद्यार्थ्यांमध्ये झालेले वर्तनबदल म्हणजेच अध्ययन असा समज वर्तनवादी अभ्यासक्रमात आहे. वर्तनवादी अभ्यासक्रम, दृष्टिकोन जुना व पारंपरिक दृष्टिकोन म्हणूनही ओळखला जातो. वर्तनवादी अभ्यासक्रमाचे मुख्य ध्येय हे कार्यक्षमता संपादित करणे हे आहे.

क) गृहीतके –

वर्तनवादी अभ्यासक्रम दृष्टिकोन खालील गृहीतकांवर आधारलेला असतो.

. अभ्यासक्रमाची ध्येये व उद्दिष्टे ही विशिष्ट असतात.

. विशिष्ट अध्ययन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अभ्यासक्रमात आशय व विविध कृती यांचे समायोजन केलेले असते.

. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक कृतीचे निरीक्षण करता येते व निरीक्षणातून विद्यार्थ्यांच्या ध्येय व उद्दिष्टांच्या संपादणुकीचे पुरावे मिळतात.

. अभ्यासक्रमातील प्रत्येक कृती ही विद्यार्थ्यांस ध्येय व उद्दिष्टाप्रत घेऊन जाण्यास मदत करते.

. विद्यार्थी फलिताच्या मूल्यमापनाचेही ध्येये उद्दिष्टे विशिष्ट असतात.

ख) वैशिष्ट्ये :

वर्तनवादी अभ्यासक्रम दृष्टिकोनाचे खालील वैशिष्ट्ये सांगितली जातात.

अध्ययन म्हणजे वर्तनबदल या तत्वांवर अधिक भर –

वर्तनवादी अभ्यासक्र म दृष्टिकोनात विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित वर्तन बदल करणे या दृष्टिनेच प्रयत्न केलेले असतात. विद्यार्थ्यांचे निरीक्षण क्षम व बाह्य वर्तनबदलाचाच येथे विचार केला जातो.

प्रात्यक्षिक कार्यावर भर –

विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये विकसित करणे हे या अभ्यासक्रमाचे मुख्य उद्दिष्ट असते. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक कार्य करण्याची संधी विद्यार्थ्यांना वारंवार मिळावी यासाठी प्रात्यक्षिक कार्यावर भर देण्यात आलेला असतो.

विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाकडे दुर्लक्ष –

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र आवडी निवडी असतात, स्वतंत्र इच्छा व गरजा असतात. याचा फारसा विचार या अभ्यासक्रमात केला जात नाही. विद्यार्थ्यांस विषय निवडीचे, अनुभव निवडीचे स्वातंत्र देण्याचाही विचार केला जात नाही.

सैद्धांतिक घटकास कमी महत्व –

विद्यार्थ्यांमध्ये वर्तनबदलासाठी सैद्धांतिक घटकापेक्षा प्रात्यक्षिक कार्य अधिक महत्वाचे असते किंवा सैद्धांतिक घटकाची वर्तनबदलासाठी फारशी गरज नाही असा विचार वर्तनवादी अभ्यासक्रम दृष्टिकोनात मानला जातो.

कौशल्य विकासावर भर –

वर्तनवादी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानसंपन्नतेपेक्षा कौशल्य विकास करण्यावर अधिक भर दिला जातो. कौशल्य विकासाशिवाय विद्यार्थ्यात अपेक्षित वर्तन बदल होवू शकत नाहीत असा विचार केला जातो.

घ) वर्तनवादी अभ्यासक्रम दृष्टिकोनात शिक्षकाची भूमिका–

. विद्यार्थ्यांमधील नेमके अपेक्षित वर्तनबदल निश्चित करणे.

. विद्यार्थी वर्तन बदलासाठी आवश्यक सैद्धांतिक विषय व आशयाची निवड करणे.

. विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक कार्याने प्रमाण निश्चित करणे.

. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसन करण्यासाठी सरावाचे प्रमाण निश्चित करणे.

. विद्यार्थ्यांत अपेक्षित वर्तन बदल घडविण्यासाठी आवश्यक अध्यापन कार्यनिती ठरविणे.

३.३.३.३ क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम दृष्टिकोन

क) अर्थ :

क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम दृष्टिकोनात 'क्षमता' या शब्दाचा अर्थ खूप व्यापक आहे. क्षमता म्हणजे कौशल्य, ज्ञान, वर्तन, अभिवृत्ती, अभियोग्यता, आत्मविश्वास, अनुभव, बुद्धिमत्ता व कार्यकुशलता यांचे एकत्रिकरण करून उपयोगात आणता येणारी कुवत होय. क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम दृष्टिकोनात CBC (Competency based Curriculum) असेही म्हटले जाते. प्रत्येक विद्यार्थ्यांस सक्षम बनविण्यासाठी क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम तयार करताना खालील घटकांचा विचार करावा लागतो.

ख) अपेक्षित घटक :

. सामान्य क्षमता क्षेत्रांची ओळख करणे (Identify General Competency Areas)
. विशिष्ठ क्षमता स्पष्ट करणे (Define Specific Competencies)
. कृतींचे निकष प्रस्थापित करणे (Establish Criteria for performance)
. स्विकृत अध्ययन पद्धतीची चौकट ठरविणे (Outline Acceptable learning method)
. अध्ययन पद्धतींचा सराव करणे (Practice learning methods)
. कृतींचे मूल्यनिर्धारण करणे (Access Performance)
. मूल्यमापन, सुधारित व पुनरावृत्ती करणे (Evaluation, Refine and Repeat)

ग) वैशिष्टे :

क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम दृष्टिकोनाची खालील वैशिष्ट्ये सांगितली जातात.-

क्षमता संपादनावर अधिक भर : विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यासाठी किंवा कार्यासाठी आवश्यक क्षमतांची निवड केली जाते व त्या क्षमता संपादनावर भर देवून अभ्यासक्रमाची उद्दिष्टे निश्चित केली जातात. या सर्व क्षमता प्राप्त करण्यासाठी आवश्यक अध्ययन अनुभवांची मांडणी अभ्यासक्रमात केली जाते. यामूळे हा अभ्यासक्रम प्रामुख्याने क्षमता संपादनावर अधिक भर देतो.

कौशल्य संपादनावर भर : प्रस्तून अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांची कारककौशल्ये व मानसिक कौशल्ये या दोहोंचा विचार केला जातो. विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी उपक्रम, कार्यक्रम व विविध अध्ययन अनुभवांची मांडणी केली जाते.

मूल्यमापनाचे वेगळेपण : विद्यार्थ्यांनी क्षमता प्राप्त केल्या आहेत किंवा नाही याचा विचार या अभ्यासक्रमात केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांच्या क्षमतांचे मूल्यमापन करण्यासाठी मूल्यमापन करण्यासाठी मुल्यमापन पद्धतीत वैविध्यता आणली जाते. येथे क्षमता कितपत साध्य झाली आहे? यापेक्षा क्षमता प्राप्त झाली की नाही याचा अधिक विचार केला जातो. म्हणजेच फलनिष्पत्तीस महत्त्व दिले जाते.

घ) क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम दृष्टिकोनात शिक्षकाची भूमिका–

. विद्यार्थ्यांच्या भावी कार्यासाठी आवश्यक क्षमतांची निश्चिती करणे.
. विद्यार्थी वय, स्तर लक्षात घेऊन क्षमतांची व्याप्ती ठरविणे.
. क्षमता प्राप्तीसाठी वैविध्यपूर्ण साधने, अध्ययन स्त्रोत यांची निवड करून अंमलबजावणी करणे.
. विद्यार्थ्यांच्या क्षमता प्राप्तीचे वारंवार चाचणीद्वारे प्रत्याभरण करणे.
. प्रत्याभरणानंतर आवश्यकता असेल तर क्षमता प्राप्तीसाठी उपचारात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

३.३.३.४ क) ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम दृष्टिकोन

क) अर्थ :

ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम दृष्टिकोनास इंग्रजीत Constructivist curriculum Approach असे म्हटले जाते. सध्या भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम दृष्टिकोनाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. ज्ञानरचनावादी दृष्टिकोनास मानसशास्त्रीय पाया आहे किंबहुना ज्ञानरचनावाद ही संकल्पना मानसशास्त्रातूनच अधिक विकसित झाली आहे. ज्ञानरचनावादाचे प्रामुख्याने तीन प्रकार सांगितले जातात. यामध्ये जीन पियाजे यांचा बोधात्मक ज्ञानरचनावाद, वायगोत्सकी यांचा सामाजिक ज्ञानरचनावाद व ग्लेसरफिल्ड यांचा समूह ज्ञानरचनावाद होय. ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम दृष्टिकोनामध्ये या तिन्ही ज्ञानरचनावादी प्रकारांचा प्रभाव आपणास दिसतो.

ख) गृहीतके –

ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम दृष्टिकोनाची खालील गृहीतके सांगितली जातात.

. अध्ययनकर्ता स्वत:च्या अनुभवातून ज्ञान निर्मिती करू शकतो.
. वैविध्यपूर्ण अनुभवाद्वारे ज्ञानाची निर्मिती होते.
. अध्ययन करणे म्हणजे स्वत: अनुभवांचे अर्थनिर्वचन करणे होय.
. अध्ययन ही एक अत्यंत सक्रिय प्रक्रिया आहे.
. ज्ञान हे संदर्भीय घटकांवर अवलंबून असते.
. सामाजिक आंतरक्रिया अध्ययनात महत्त्वाची भूमिका बजावतात.

ग) वैशिष्टे :

ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम दृष्टिकोनाची खालील गृहीतके सांगितली जातात.

अध्ययनास अनन्यसाधारण महत्व – ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम दृष्टिकोनात सर्वाधिक महत्त्व हे अध्ययन प्रक्रियेस देण्यात आले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांची अध्ययन क्रिया कशी होते, यास महत्त्व दिले जाते. अध्यापन क्रिया व विविध कृती या अध्ययनास पूरक असतात.

अध्ययनकर्त्याचे पूर्वज्ञान व नवीन ज्ञान यात सांगड : या अभ्यासक्रमात अध्ययनकर्त्याचे पूर्वज्ञान व नवीन ज्ञान यात संबंध जोडण्याचा प्रयत्न केला जातो. पूर्वज्ञानातूनच नवीन ज्ञानाचे आकलन होऊ शकते यावर ज्ञानरचनावादाचा विश्वास आहे. ज्या अध्ययनकर्त्यास असा संबंध जोडता येतो तो अधिक चांगल्या प्रमारे अध्ययन करू शकतो.

अध्ययनाचे संपूर्ण स्वातंत्र्य : कोणत्याही विद्यार्थ्यास अध्ययन कसे करावे? काय करावे? अशा बाबतीत काही अंशी स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न या अभ्यासक्रमात केला जातो.

कृतिशीलतेस अधिक वाव : या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या कृतीस अधिक महत्त्व दिले जाते. विद्यार्थी कृतीतून अनुभव घेतो व अनुभवातून माहितीचे संकलन करतो, याच माहितीचा सर्वांगीण विचार करून ज्ञान प्राप्त होऊ शकते या पद्धतीने ज्ञानरचनावादी अभ्यासक्रमाची मांडणी असते. विद्यार्थी जितका कृतिशील होईल तितका तो ज्ञानसंपन्नतेकडे जाईल या तत्त्वांचा विचार केला जातो.

चिकित्सक व सृजनशील विचारास प्राधान्य : विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने अध्ययन न करता त्याने ज्ञान स्वत: शोधून काढावे ही अपेक्षा अभ्यासक्रमात असते. यासाठी प्रत्येक अध्ययन परिस्थितीत विद्यार्थी चिकित्सक विचार करतो, स्वत:ची मते व कल्पना मांडण्याचा प्रयत्न करतो. यातून त्याच्या चिकित्सक वृत्तीस व सृजनशीलतेस चालना देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला जातो.

अध्ययनकर्त्याचे सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा विचार : अध्ययनकर्त्याच्या सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा विचार करून त्यास त्याच्या पद्धतीने अध्ययनास वाव दिला जातो. त्याच्या सामाजिक व सांस्कृतिक स्थळांना भेटी देण्याची संधीही उपलब्ध करून दिली जाते. सामाजिक आंतरक्रियातून अध्ययन सक्षम होते हा विचार यात मान्य केला आहे.

घ) अध्ययनास पोषक वातावरण निर्मिती :

अध्ययनकर्त्यास सहजतेने व आंनदाने अध्ययन करता यावे यासाठीचे आवश्यक वातावरण निर्माण करणे तितकेच आवश्यक आहे हा विचार मान्य केला आहे. अध्ययनकर्त्यास पोषक वातावरण मिळाल्यावरच त्यास अध्ययन करण्याची प्रेरणा अधिक मिळते. या सर्व बाबींचा विचार या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी करताना केला जातो.

न) ज्ञानरचनावादी अभ्यासक्रमात शिक्षकाची भूमिका :

. या अभ्यासक्रमात शिक्षकाची भूमिका सुलभक, सुविधादाता, मार्गदर्शक, समूपदेशक, मदतनीस व संशोधकाची असते.
. विद्यार्थ्यांना वैविध्यपूर्ण कृती करण्यासाठी आवश्यक साधने, तंत्रे व उपकरणांची उपलब्धता करून देणे.
. प्रत्येक विद्यार्थ्यास सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा आदर करण्यास प्रवृत्त करणे.

. विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत अर्थ शोधण्याची (Search for meaning) प्रक्रिया आणण्याचा प्रयत्न करणे.
. अध्ययन प्रक्रियेत कोणत्याही घटकाचा संपूर्ण (whole) विचार करायचाच तसेच भागश: (Parts) आकलन करण्याची संधीही उपलब्ध करून देणे.
. प्रत्येक विद्यार्थ्यास वैयक्तिकरित्या अर्थ निर्मिती करण्यास प्रवृत्त करणे.

३.३.३.५ सुप्त अभ्यासक्रम

सुप्त अभ्यासक्रम ही संकल्पना १९६४ मध्ये फिलिप जॅक्सन यांनी मांडली. जॅक्सन यांनी सुप्त अभ्यासक्रम हा वर्गाध्यापनात अनियोजितपणे मांडला जातो असे म्हटले व जीवनमूल्यांचा आणि सामाजिक घटकांचा अध्यापनावर असणारा प्रभाव यास त्यांनी सुप्त अभ्यासक्रम म्हटले. प्रथमत: आपण काही सुप्त अभ्यासक्रमाच्या व्याख्या पाहू.

"Hidden curriculum refers to the unwritten, unofficial and often unintended lesson, values and perespectives pectives that students learn in school."
"Hidden curriculum as that which includes all those aspects of the school environment that without being part of the official explicit curriculum contribute implicity to relevent social learning."
"Hidden curriculum, which refers to the kinds of learning children derive from the very mature and organizational design of the public school, as well as from the behaviours and attitudes of teachers and administrators."
"Hidden curriculum comsist of those things pupils learn through the experience of attending school rather than the stated educational objectives of such institutions."

वरील सर्व व्याख्यांवरून आपणास सुप्त अभ्यासक्रमाचा अर्थ असा समजतो की, शाळेमध्ये कोणताही उद्देश न ठेवता विविध कृती केल्या जातात, विविध क्रिया केल्या जातात यातून विद्यार्थी नकळत किंवा अप्रत्यक्षरित्या बऱ्याच बाबी अनुभवतो व अध्ययन करत असतो. यातून तो ज्ञान, मूल्ये व कौशल्ये यांचा स्वीकार करतो. यासच सुप्त अभ्यासक्रम असे म्हणतात.

प्रत्येक शाळेमध्ये शासनाने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर बऱ्याच बाबींची अंमलबजावणी केली जाते. विद्यार्थ्यांचे अध्ययन व्हावे या दृष्टीने शालेय वातावरणाची निर्मिती केली जाते. या वातावरणामुळे विद्यार्थी दैनंदिन शालेय जीवनात विशिष्ट वृत्ती, सवयी व श्रद्धा आत्मसात करत असतो. विद्यार्थी सहजपणे शाळेची संस्कृतीही स्वत:मध्ये आत्मसात करतो. हाही सुप्त अभ्यासक्रमाचाच भाग असतो.

शिक्षक स्वत:चे अध्यापन करताना कळत - नकळत विद्यार्थ्यांना बरेच अनुभव देत असतात. उदाहरणार्थ वैयक्तिक मते, विचार, तत्त्वज्ञान, शालेय स्थितीवर टिप्पणी. याबरोबरच स्वत:चा पोषाख, लकबी, आचार यातून अनेक बाबी विद्यार्थी आत्मसात करतात. शाळेतील विविध अभ्यासपूरक कार्यक्रमांद्वारे संक्रमित होणारे विचार, तत्त्वज्ञान, संस्कृती व वातावरण यांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या वर्तनावर होत असतो. हाही सुप्त अभ्यासक्रमाचाच भाग असतो. यावरून सुप्त अभ्यासक्रमाची खालील वैशिष्ट्ये सांगता येतात.

वैशिष्ट्ये :

. सुप्त अभ्यासक्रम हा नियोजित नसतो.
. सुप्त अभ्यासक्रमाचा मूल्यमापन, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या वर्तनावर खूप परिणाम होत असतो.
. सुप्त अभ्यासक्रम कोणत्याही संस्थेकडून, अभ्यासमंडळाकडून किंवा शासनाकडून तयार केला जात नाही.
. सुप्त अभ्यासक्रमाचे मूल्यमापन करण्याची कोणतीही व्यवस्था शाळांमध्ये उपलब्ध नसते.
. सुप्त अभ्यासक्रमाला कोणत्याही विषयाची मर्यादा नसते. तो कोणत्याही शालेय व्यवहारातून किंवा अनुभवातून संक्रमित करता येतो.
. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत विकासासाठी सुप्त अभ्यासक्रमाची खूप मदत होते.

३.३.४ अभ्यासक्रम निर्मिती प्रक्रिया

अभ्यासक्रमाची संकल्पना, प्रकार व विविध दृष्टिकोन आपण अभ्यासले. अभ्यासक्रम निर्मिती करताना कोणकोणत्या बाबी लक्षात घ्याव्या लागतात याचीही माहिती आपल्याला असणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रम कोणत्याही स्तरावरचा असो त्यात काही शाश्वत मूल्ये, मानसशास्त्रीय सिद्धांत व समाजशास्त्रीय सिद्धांत यांचा विचार करावा लागतो. त्याशिवाय अभ्यासक्रमास परिपूर्णता येऊ शकत नाही. तसेच आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे. या युगात अभ्यासक्रम निर्मिती करताना संपूर्ण जगाचा विचार करावा लागतो, जागतिक स्तरावरील शैक्षणिक व्यवस्था, संशोधने, ज्ञान, सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था इत्यादींचा विचारही करावा लागतो.

क) अभ्यासक्रम विकसन तत्त्वे

कोणताही अभ्यासक्रम विकसित करताना खालील तत्त्वांचा विचार करावा लागतो.

. ध्येयाधिष्ठित अभ्यासक्रम असला पाहिजे.
. विद्यार्थी केंद्रित अभ्यासक्रम असावा.
. उपयुक्त अभ्यासक्रम असावा.
. प्रायोगिकतेला अधिक संधी देणारा अभ्यासक्रम असावा.
. लवचीक अभ्यासक्रम असावा.
. अत्यंत स्पष्ट व नि:संदिग्ध अभ्यासक्रम असावा.
. अभ्यासक्रमात अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमांचे मार्गदर्शन असावे.
. विविध विषय व प्रात्याक्षिक कार्यात समवाय साधलेला अभ्यासक्रमात असावा.
. अभ्यासक्रमाला तात्त्विक अधिष्ठान असावे.
. अभ्यासक्रमाची मांडणी सुसंगत व मनोरंजक असावी.
. अभ्यासक्रमात वैविध्यता असावी.

अभ्यासक्रम तयार असताना जसा वरील तत्त्वांचा विचार करावा लागतो तसे अभ्यासक्रम निर्मितीत अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साधता, सामाजिक व नैतिक मूल्यांची जोपासना, क्षमतांचा विकास, जबाबदारनागरिक घडवणूक आणि राष्ट्रिय एकात्मता व आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करणे इत्यादी.

ख) अभ्यासक्रम निर्मितीच्या पायऱ्या :

वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच प्रत्यक्ष अभ्यासक्रम निर्मितीची प्रक्रिया सुरू होते. या अभ्यासक्रम निर्मिती प्रक्रियेत खालील पायऱ्या सांगितल्या जातात.

अभ्यासक्रम निर्मितीच्या गरजांची निश्चिती करणे–

कोणत्याही अभ्यासक्रमाची उद्दिष्टे व रचना करावयाची असल्यास प्रथमत: अभ्यासक्रम निर्मितीची गरज व अभ्यासक्रमात करावयाचे बदल यांची योग्य जाणीव असावी लागते. अन्यथा अभ्यासक्रम निर्मितीस योग्य दिशा मिळू शकत नाही. अभ्यासक्रम निर्मितीची गरज निश्चित करणे म्हणजेच खालील प्रश्नांचा विचार करणे होय.

. अभ्यासक्रम तयार करण्याचा उद्देश काय?
. आजच्या स्थितीत अभ्यासक्रमातील अडचणी कोणत्या?
. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रिय स्तरावरील शैक्षणिक बदल कोणते?
. जागतिक स्तरावरील नवीन ज्ञान कोणते?
. अभ्यासक्रम अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी कोणत्या?
. गुणत्तापूर्ण अभ्यासक्रमासाठी कोणते परिवर्तन अपेक्षित आहे?

अनुभवी व तज्ज्ञांची समिती स्थापन करणे :

ज्या स्तरासाठी अभ्यासक्रम विकसित करावयाचा आहे त्यासाठी त्या क्षेत्रातील अत्यंत अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तीची निवड करणे त्यानुसार समिती स्थापन करणे. या समितीची स्थापना करताना संबंधित क्षेत्रातील शिक्षण तज्ज्ञ व्यक्ती, अनुभवी प्राचार्य, संबंधित विभागाचे शासकीय अधिकारी, त्या क्षेत्रात अध्यापन करणारे अनुभवी व सक्षम शिक्षक तसेच इतर क्षेत्रातील परंतु अभ्यासक्रम विकसनाचा अनुभव असणाऱ्या तज्ज्ञ व्यक्ती इत्यादींचा विचार केला जातो. या समितीस अभ्यासक्रम निर्मितीचे आदेश व सूचना दिल्या जातात.

शैक्षणिक तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, मानवशास्त्र व शासन धोरणे यांचा विचार :

अभ्यासक्रम विकसन समितीने शासनाच्या प्रत्येक धोरणांचा अभ्यासक्रम विकसित करताना विचार होईल याची काळजी घ्यावी. शासकीय धोरणातून शिक्षणविषयक असलेल्या अपेक्षा अभ्यासक्रमातून साध्य होतील याची दक्षता घ्यावी. तसेच समर्पक तात्त्विक, समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय अधिष्ठान अभ्यासक्रमाला प्राप्त करून देण्याचाही प्रयत्न करावा.

अभ्यासक्रम ध्येये व उद्दिष्टे ठरविणे :

अभ्यासक्रम विकसन करण्यापूर्वी अभ्यासक्रमाची चौकट ठरवणे म्हणजेच अभ्यासक्रम ध्येये व उद्दिष्टांची निश्चिती करणे होय. अभ्यासक्रमास योग्य दिशा मिळण्यासाठी तसेच अभ्यासक्रमाची अचूक मांडणी होण्यासाठी दूरगामी व तत्कालीन ध्येये व उद्दिष्टे यांची निश्चिती करावी लागते.

अभ्यासक्रम घटक व कार्यनीती निश्चित करणे :

अभ्यासक्रम उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी आवश्यक घटकांची निश्चिती करून त्या सर्व घटकांची व्याप्ती ठरवणे, महत्त्वाचे असते. प्रत्येक घटकांची तात्त्वीक व मानसशास्त्रीय दृष्टीने मांडणी होईल याची खात्री करावी लागते. प्रत्येक घटकांचा योग्य क्रम निश्चित करावा लागतो. घटकांची निश्चिती होताच अभ्यासक्रम अंमलबजावणीची कार्यनीती ठरवावी लागते. अभ्यासक्रमातील प्रत्येक घटक केव्हा व कसा राबवायचा याचेही विवेचन करावे लागते. अभ्यासक्रमातील सैद्धांतिक व प्रात्याक्षिक कार्य राबवण्याची स्वतंत्र कार्यनीती निश्चित करावी लागते. अभ्यासक्रम अंमलबजावणी करण्याचा कालावधीही निश्चित करावा लागतो.

अभ्यासक्रमावर प्रतिक्रिया व प्रत्याभरण घेणे :

तज्ज्ञ समितीने तयार केलेला अभ्यासक्रम प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यापूर्वी संबंधित व्यक्तिंकडून अभ्यासक्रमावर आधारित प्रतिक्रिया व प्रत्याभरण घेणे आवश्यक असते. अभ्यासक्रमाशी संबंधित विविध व्यक्तींकडून सूचना व शिफारशी प्राप्त केल्यानंतर त्यानुसार अभ्यासक्रमात योग्य ती सूधारणा करावी लागते.

अंतिम मसुदा सादर करणे :

वरील सर्व पायऱ्यांनुसार तयार करण्यात आलेला अभ्याक्रम तज्ज्ञ समितीने एकमताने संमत केल्यास त्या अभ्यासक्रमाचं अंतिम संपादन करून अभ्यासक्रमाचा अंतिम मसुदा तयार करावा. तयार करण्यात आलेला अंतिम मसुदा संबंधित शैक्षणिक संस्थेस सादर करावा.

अशा पद्धतीने कोणत्याही प्रकारचा व स्तराचा अभ्यासक्रम तयार करण्यात येतो.

३.३.५ अभ्यासक्रम निर्मितीवर परिणाम करणारे घटक

अभ्यासक्रमावर परिणाम करणारे घटक :

कोणत्याही स्तरावरील अभ्यासक्रम तयार करताना विविध प्रकारच्या विचारसरणी, समाजाच्या गरजा, आशा आकांशा, तत्कालीन राजकीय व्यवस्थेतील तत्त्वज्ञान, मानसशास्त्रीय विचार इ. चा प्रभाव पडत असतो. तो कसा पडतो हे पुढील विवेचनांवरून लक्षात येईल.

I) शैक्षणिक तत्त्वज्ञान

एखाद्या देशाने जी विचारसरणी स्वीकारली आहे त्या तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब अभ्यासक्रमात पडलेले दिसून येते. उदा. भारताने धर्मनिरपेक्षता हे मूल्य स्वीकारले आहे. तर त्या विरुद्ध पाकिस्तानची घटनाच धार्मिकतेवर आधारललेली आहे.

त्यामुळे भारतीय शिक्षणामध्ये 'धार्मिक शिक्षण' हा घटक आढळत नाही. तर पाकिस्तानामध्ये 'धार्मिक शिक्षण' हा अभ्यासक्रमाचा पाया आहे. चीनमध्ये कम्युनिस्ट राजवट असल्याने अभ्यासक्रमात तात्त्वीकदृष्ट्या विविधता आढळत नाही. तर भारतामध्ये किंवा ज्या राष्ट्रांनी लोकशाही स्वीकारलेली आहे तेथे विविध प्रकारच्या तत्त्वज्ञानांचा प्रभाव अभ्यासक्रमावर दिसून येतो.

*** तत्त्वज्ञानातील विविध संप्रदाय :** तत्त्वज्ञानातील विविध संप्रदायांपैकी ज्या संप्रदायाचा पगडा तत्कालीन समाजावर असतो त्या संप्रदायाचा प्रभाव अभ्यासक्रमावरदेखील पडलेला आढळून येतो. आपल्याकडे अध्यात्मवादाचा पगडा भारतीय जनतेवर असल्याने अभ्यासक्रमातदेखील त्याचा प्रभाव जाणवतो. अमेरिकेसारख्या राष्ट्रांत कार्यवादाचा प्रभाव जाणवतो. अर्थात कालक्रमानुसार समाजदेखील बदलत असतो त्याचे तत्त्वज्ञानही बदलत जाते व साहजिकच त्याचा परिणाम अभ्यासक्रमावरदेखील होत राहतो.

*** राष्ट्रीय ध्येय धोरणे :** राष्ट्राची धोरणे कोणती त्यानुसार देशातील भावी नागरिक घडविणे क्रमप्राप्त ठरते. कोठारी कमिशनने 'औद्योगिकतेला गती देणे' हे शिक्षणाचे ध्येय सांगितले व त्यानुसार आपण १० + २ + ३ या आकृतिबंधामध्ये + २ स्तरांवर कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम सुरू केले. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये तर आपण मानवाला संसाधन मानले व त्यानुसार मानवाला व्यक्ती म्हणून नव्हे तर मानवाला संसाधन म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला, तर आता शासनाने कौशल्य विकासाला (Skill Development) प्राधान्य दिल्यामुळे पुढे कदाचित कौशल्याधिष्ठित पदव्या व पदविका मिळतील असे होणे साहजिकच आहे. अगदी इतिहासातदेखील याचे संदर्भ सापडतात. अथेन्स व स्पार्टा ही शेजारील राज्ये होती. स्पार्टाला नैसर्गिक संरक्षण नव्हते. ते अगदी सपाट भूमीवर बसलेले होते तर अथेन्स हे चहूबाजूंनी डोंगराच्या कुशीत बसलेले होते. म्हणून स्पार्टामध्ये लष्करी शिक्षण घेणे प्रत्येक नागरिकाला अनिवार्य होते. तर अथेन्समध्ये तशी गरज नसल्याने कला, वाङ्मय, शास्त्रे इ.चा समावेश अभ्यासक्रमात केला गेला होता.

II) मानसशास्त्रीय घटक : अभ्यासक्रम रचना करताना मानसशास्त्रीय विचारांची दखल घ्यावीच लागते. प्रबोधन काळापूर्व यादृष्टीने फारसा विचार होत नव्हता, रुसो, व्हॉल्टेअर यांच्या उदयानंतर मात्र शिक्षणामध्ये या बाबींचा समावेश होऊ लागला.

*** विद्यार्थ्यांची अभिरुची :** आपण लोकशाही राष्ट्रामध्ये राहतो म्हणून प्रत्येक व्यक्तीला व्यक्ती म्हणून जगण्याचा अधिकार मान्य केलेला आहे. त्याचप्रमाणे आपण काय शिकावे हेही विद्यार्थ्यांनी ठरविणे मान्य करावे लागते. परंतु विद्यार्थ्यांचे वय व त्या वयातील समज लक्षात घेऊन त्याला ते ठरविता येणे कठीण होते. म्हणून मग त्याला काय आवडते हे पाहून शिकविणे अभिप्रेत असते. विद्यार्थ्यांच्या अभिरुचीनुसार जर त्याला शिक्षण मिळाले तर तो त्या क्षेत्रात खूप उच्च पातळीपर्यंत जाण्याची शक्यता वाढते. म्हणून अभ्यासक्रम तयार करताना विद्यार्थ्यांची अभिरुची लक्षात घ्यावीच लागते. सर्वांची सारखीच अभिरुची असण्याची शक्यता नसते म्हणून अभ्यासक्रमात वैविध्य ठेवणे क्रमप्राप्त ठरते, जेणे करून आपल्या अभिरुचीनुसार विद्यार्थी अभ्यास करता येईल.

*** विद्यार्थ्यांच्या विकासावस्था :** विद्यार्थ्यांच्या विविध विकासावस्थेची काही ठळक वैशिष्ट्ये आढळून येतात. कोणत्या वयात कोणत्या क्षमतेचा कितपत विकास होते यासंबंधी खूप संशोधने झाली आहेत. या संशोधनाच्या निष्कर्षांचा विचार करून अभ्यासक्रम तयार करावा लागतो. उदा. आईनस्टाईनच्या सापेक्षता वादाचा सिद्धांत कितीही महत्त्वपूर्ण असला तरी तो प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात ठेवणे अयोग्य ठरते. कारण तो समजून घेण्याची क्षमता अजून या विद्यार्थ्यांमध्ये विकसित झालेली नसते.

*** विद्यार्थ्यांची क्षमता व ताणतणाव :** एखादा अभ्यासक्रम कितीही उपयुक्त असला तरी विद्यार्थ्यांना तो अध्ययन सुलभ वाटला पाहिजे. अन्यथा अध्ययनाचा अतिरिक्त ताण विद्यार्थ्यांवर पडून त्यांचे मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता निर्माण होते. क्वचित प्रसंगी अतिनैराश्य प्राप्त होऊन व मानसिक ताण असह्य झाल्याने विद्यार्थी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. किंवा अशा अभ्यासक्रमापासून पळ काढतात.

*** मायसशास्त्रातील संशोधनातून प्राप्त झालेले निष्कर्ष :** विद्यार्थी अध्ययन कसे करतात? कोणत्या प्रकारे अध्ययन केल्यावर अध्ययन चांगले होते? व्यक्तिमत्त्व विकासासंबंधीच्या उपपत्ती, कोणत्या प्रकारे प्रेरणा दिल्यावर अध्ययनाचा वेग वाढतो? चांगले स्मरण होण्यासाठी काय करावे लागते? विद्यार्थ्यांमध्ये कोणकोणत्या प्रकारची भिन्नता आढळून येते? बुद्धिमत्तेच्या अध्ययनाशी कसा संबंध येत असतो? विद्यार्थी विचार कसा करतात? व त्यातूनच ज्ञाननिर्मिती कशी होते? या सारख्या

बाबींची दखल घेऊनच आपणास कोणताही अभ्यासक्रम तयार करावा लागतो.

III) **समाज शास्त्रीय घटक :** आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचा विद्यार्थी एक घटक असतो, त्यामुळे विद्यार्थ्यांचा विकास करताना समाजाचा एक घटक या नात्याने त्याचा विचार करावा लागतो.

* **सामाजिक मूल्ये :** विद्यार्थी ज्या समाजात वावरतो त्या समाजाचा एक नागरिक बनणार आहे, त्या समाजाची मान्यताप्राप्त मूल्ये कोणती आहेत? त्या मूल्यांचा समावेश अभ्यासक्रमात करावाच लागतो. उदा. भारतातील नीतिमूल्ये यामध्ये फरक आहे, त्या समाजाची मान्यताप्राप्त मूल्ये कोणती आहेत? त्या मूल्यांचा समावेश अभ्यासक्रमात करावाच लागतो. उदा. भारतातील नीतिमूल्ये यामध्ये फरक आहे. उदा. पाश्चात्यामध्ये स्त्री-पुरूष संबंधातील मोकळीक अजून आपल्या समाजाने मान्य केलेली नसल्याने आपण प्रबळ अशा कुटुंब अवस्थेला मान्यता देतो व Live-in-Relationship सारखी कल्पना नाकारतो. त्यामुळे अभ्यासक्रम तयार करताना कुटुंब, कुटुंब व्यवस्था, परस्परांच्या भूमिका, त्यांच्यातील प्रेम, जिव्हाळा व कर्तव्ये समजावून देणे हे आपण लक्षात घेतो.

* **सामाजिक गरजा :** सामाजिक गरजांची पूर्ती करण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रम तयार करणे अपेक्षित असते. आपल्यावर अध्यात्मवादाचा किंवा आदर्शवादाचा कितीही पगडा असला तरी सध्याच्या परिस्थिती समाजाच्या गरजा काय आहेत याचा प्रामुख्याने विचार अभ्यासक्रम तयार करताना करावा लागतो. म्हणूनच आज आपण ज्ञानाकडून कौशल्यविकासाकडे वळलो आहोत.

* **सामाजिक रचना :** प्रत्येक राष्ट्रातील समाजाची एक विशिष्ट रचना असते त्यांच्या रूढी परंपरा, चालीरीती या बाबी सामाजिक रचनेशी अनुरूप असतात. ही सामाजिक रचना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असते. त्या रचनेला धक्का लागेल अशी कोणतीही बाब समाजाला मान्य होत नाही. समाजरचनेचीही वैशिष्टे अभ्यासक्रम तयार करताना लक्षात घ्यावी लागतात. उदा. आपल्या राष्ट्रामध्ये भाषा, प्रांत, संस्कृती धर्म यांना सामावून घेणारी समाजरचना आहे. बहुभाषिकत्व व बहुसांस्कृतित्व ही आपली वैशिष्टे आहेत. तसेच भक्कम कुटुंब व्यवस्था हेही आपल्या समाजाचे एक ठळक वैशिष्टे आहे. त्यामुळे कोणत्याही भाषासमूह, धार्मिक समूहाच्या अस्मितेला इजा पोहचणार नाही याची दखल घ्यावीच लागते. आपण या दृष्टीने भाग्यवान आहोत की, या अल्प अशा वैविध्यपूर्ण समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका अभूतपूर्व अशा संविधानात योग्य प्रकारे गुंफले आहे.

IV) **राष्ट्रीय व राजकीय घटक :** आपण ज्या राष्ट्रात राहतो त्या राष्ट्राची ध्येय धोरणे, अर्थव्यवस्था, राजकीय प्रणाली, देशाचे संविधान या बाबींचा देखील प्रभाव अभ्यासक्रमावर पडत असतो.

* **देशाचे संविधान :** राष्ट्राने जे संविधान स्वीकारलेले असते त्या संविधानाताही मान्य केलेल्या बाबी, जनतेप्रती दिलेली वचने व आश्वासने, स्वीकारलेली मूल्ये हा तर आपल्या अभ्यासक्रमाचा पाया असला पाहिजे. कारण आजचा विद्यार्थी हा उद्याचा या देशाचा नागरिक असणार आहे. हा नागरिक अधिक जबाबदार व संविधानाप्रती आदर बाळगणारा असावा अशी अपेक्षा असते. उदा. भारतीय संविधानामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार केलेला आहे. धर्मनिरपेक्षता आग्रह धरलेला आहे तर समता, स्वातंत्र, बंधुत्व व न्याय ही मूल्ये स्वीकारलेली आहेत म्हणून आपल्या अभ्यासक्रमात याचे प्रतिबिंब पडलेले असणे अभिप्रेत आहे.

* **देशाची अर्थव्यवस्था :** आपली इच्छा असो वा नसो देशाची व्यवस्था आपल्या अभ्यासक्रमाला हव्या त्या दिशेला वळवण्यात सफल होतेच. देशाच्या अर्थव्यवस्थेने विश्लेषण करून ही अर्थव्यवस्था भक्कम करता येईल या दृष्टीने अभ्यासक्रमात सोय करावी लागते. तसेच ज्या प्रकारची अर्थव्यवस्था आपण स्वीकारलेली असते त्याचेही प्रतिबिंब अभ्यासक्रमात पडलेले दिसून येते. उदा. सन १९९१ नंतर आपण खऱ्या अर्थाने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला व त्याचा परिणाम आपल्या संपूर्ण जीवनमानावर नव्हे तर अभ्यासक्रमावरदेखील झाल्याचे स्पष्टपणे दिसते. आता आपण प्रत्येक व्यक्तीला उत्पादनक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहोत.

* **देशातील राजकीय व्यवस्था :** एखाद्या देशात कोणत्या प्रकारची राजकीय व्यवस्था आहे त्याचा प्रभाव अभ्यासक्रमावर पडणे साहजिकच असते. उदा. चीनमध्ये असणाऱ्या कम्युनिझममुळे तेथील शिक्षणपद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा राष्ट्राच्या गरजांचा अधिक विचार केला जात असल्याने अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांची अभिरुची, अभिव्यक्ती, अभिवृत्ती यापेक्षा राष्ट्राची गरजपूर्ती कशी होईल अशा विषयांचा समावेश केला जातो. आपला देश लोकशाहीप्रधान असल्याने आपण

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिभिन्नतेचा विचार करून अभ्यासक्रमात विविध विषयांचा समावेश करतो.

* **राष्ट्रीय मूल्ये :** आपल्याला संविधानातील मूल्ये ही राष्ट्रीय मूल्ये होत. म्हणून ही मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या हेतूने अभ्यासक्रमात त्यांचा समावेश पायाभूत घटक म्हणून केले आहे. याशिवाय घटनेच्या चौकटीत राहूनच परंतू ज्या वेळी जो राजकीय पक्ष सत्तेवर येतो त्याचीही काही ध्येय धोरणे असतात व तो पक्ष आपल्या ध्येय धोरणानुसार अभ्यासक्रमात बदल घडवीत असतो.

३.३.६ अभ्यासक्रम निर्मितीचे संदर्भ

अभ्यासक्रम निर्मिती करताना तो ज्या स्तरासाठी तयार करावयाचा आहे तो स्तर, विद्यार्थी क्षमता व वय, शिक्षक पात्रता, आणि आशयाचे स्वरूप या सर्व बाबींचा संदर्भ अभ्यासक्रमात विचारात घ्यावा लागतो. अभ्यासक्रम निर्मिती करताना एवढ्याच बाबींचा संदर्भ असतो असे नाही तर यापेक्षा काही वेगळ्या म्हणजेच राजकीय (Political), आर्थिक (Economic), तंत्रज्ञानात्मक (Technological), वैविध्यता (Diversity), अध्ययन उपपत्ती (Learning theories), वातावरण (Envirinment), सैद्धांतिक संरचना / आराखडा (Theorotical framework), तात्त्विक अधिष्ठान (Philosophical foundation) याबाबींचाही संदर्भ असतो.

क) राजकीय

राजकीय स्थितीचा अभ्यासक्रम निर्मितीवर प्रभाव पडतो. प्रत्येक राजकीय पक्षांची धोरणे व ध्येये स्वतंत्र असतात. त्यामुळे ज्या राजकीय पक्षाचे शासन कार्यरत असेल त्या पक्षांच्या विचारसरणीचा प्रभाव अभ्यासक्रम निर्मितीवर होतो. त्या राजकीय पक्षाच्या अभ्यासक्रमाबाबत किंवा शिक्षणाबाबतच्या अपेक्षा याचाही परिणाम अभ्यासक्रम निर्मितीवर होत असतो.

ख) आर्थिक


अभ्यासक्रम ज्या देशात, राज्यात निर्माण केला जातो त्या देशाच्या, राज्याच्या आर्थिक सद्यःस्थितीचा प्रभाव अभ्यासक्रम निर्मितीवर होतो. तो देश शिक्षणामधून कोणत्या प्रकारचे नागरिक निर्माण करू इच्छितो तसेच शिक्षण प्राप्त विद्यार्थ्यांकडून कशा प्रकारच्या आर्थिक परतीच्या अपेक्षा आहेत, यावरही अभ्यासक्रम निर्मिती प्रक्रिया ठरत असते. देशाच्या आर्थिक विकासाचा दर सतत प्रगतशील ठेवताना न्याय, विकास साधता आला पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली होती. त्यानुसार विकासाची जबाबदारी राज्य व राष्ट्रावर होती, त्याप्रमाणे विकासही साधली गेला. परंतु १९९१ नंतरच्या आर्थिक धोरणात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण स्वीकारल्यामुळे भांडवलशाही व खाजगीकरणातून विकासाची संकल्पना पुढे आली. शासनाने नियुक्त केलेल्या खाजगी व्यवस्थेकडून कार्य करून घेणे, जागतिक स्पर्धेत झालेली देवाण-घेवाण ह्या सर्वांवर अभ्यासक्रमातून प्रकाश आवश्यक आहे. आर्थिक धोरणानुसार सरकारची ध्येय धोरणे यांचा समावेश अभ्यासक्रमात असावा.

ग) तंत्रज्ञानात्मक

२१ व्या शतकातील कोणत्याही अभ्यासक्रमावर तंत्रज्ञानाचा प्रभाव नाही असे होऊ शकत नाही. आज प्रत्येक स्तरावरील अभ्यासक्रम निर्मितीत तंत्रज्ञानाचा दृष्टिकोन महत्त्वाची भूमिका बजावतो. अभ्यासक्रम अंमलबजावणीत तंत्रज्ञानाची भूमिका निश्चित करावी लागते. ही भूमिका त्या स्थानिक पातळीवरील तंत्रज्ञानाच्या सोयी सुविधा किंवा सद्यःस्थितीवर अवलंबून असते. अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारचे अध्ययन अनुभव द्यावयाचे आहेत हेही ठरवावे लागते.

घ) वैविध्यता

अभ्यासक्रम ज्या ठिकाणी विकसित केला जातो तेथील वैविध्यतेचा अभ्यासक्रम निर्मितीवर प्रभाव पडतो. ते घटक पुढीलप्रमाणे -



अभ्यासक्रम निर्मितीत त्या ठिकाणची सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व भाषिक तत्त्वे, मूल्ये यांचा अभ्यासक्रमावर प्रभाव पडतो.

च) अध्ययन उपपत्ती

मानसशास्त्रामध्ये प्रयोगाद्वारे उदयास आलेल्या अध्ययन उपपत्तींची मांडणी केलेली असते. ज्यामध्ये अध्ययन प्रक्रिया अधिक सुलभ होण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे व अध्ययनाचा एक स्वतंत्र अर्थ स्पष्ट केलेला असतो. तसेच आशयाची मांडणी, आंतरक्रियात्मक कृती व अनुभव यांचा अध्ययनासाठी अधिकतम वापर करण्याबाबतची माहिती स्पष्ट केलेली असते. या सर्वांचा प्रभाव अभ्यासक्रम निर्मितीवर होतो.

छ) वातावरण

स्थानिक पातळीवरील वातावरण, पर्यावरणीय स्थिती याचा मानवी जीवनावर परिणाम होतो व त्यामुळे या वातावरणाचा विचार अभ्यासक्रम निर्मितीत करावा लागतो.

ज) सैद्धांतिक संरचना / आराखडा

अभ्यासक्रम निर्मिती करताना ज्या स्तरासाठी व् विद्यार्थ्यांसाठी तो विकसित केला जातो आहे. त्यांच्यासाठी आवश्यक अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे स्वरूप, विकासाचे पैलू व शैक्षणिक अध्ययन स्त्रोत, भौतिक सुविधा यांचा विचार करावा लागतो. त्या सर्वांचा प्रभाव अभ्यासक्रम निर्मितीवर होतो.

झ) तात्त्विक अधिष्ठान –

प्रत्येक अभ्यासक्रमाची एक स्वतंत्र तात्विक बैठक असते. ज्यामध्ये जागतिक, राष्ट्रीय, राज्य व स्थानिक स्तरावरील तत्त्वज्ञानात्मक मतांचा प्रभाव असतो.

ट) ज्ञानाचा प्रस्फोट

आज २१ व्या शतकात ज्ञानाचा प्रस्फोट झाला आहे. नवनवे विचार, ज्ञान, संशोधन व माहिती उदयाला येत आहे. सध्या आयसीटीचा प्रस्फोट प्रामुख्याने मानला जावू लागला आहे. कारण क्षणार्धात एका क्लिकवर खूप माहिती उपलब्ध होते. काल असणारी स्थिती, ज्ञान आजच्या घडीला मागे पाडते. त्याचे शिक्षणावर होणारे परिणाम, ज्ञानाची अद्ययावतता या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. आजच्या काळात माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून अध्ययन अध्यापन कसे सुलभ, सोपे, कमी खर्चिक व सर्वांपर्यंत नेता येईल या संदर्भात विचार महत्त्वाचा ठरतो. अध्ययनाच्या संकल्पना बदलत आहेत. अध्ययनाचे स्त्रोत, संदर्भ बदलत आहे त्यामुळे अद्ययावत राहणे आवश्यक आहे.

ठ) सामाजिक संदर्भ

सामाजिक संदर्भाच्या बाबतीत विचार केल्यास व्यक्तीचा मिळून समाज बनतो. समाजामध्ये व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाजामध्ये देवाण-घेवाण होते. कधी वैचारिक स्वरूपात तर कधी अभ्यासक्रम निर्मिती करताना सामाजिक संदर्भाचा विचार करणे आवश्यक ठरते. समाजामधील विविध घटकांचा विचार करून समाजवादी समाज स्थापन होऊन त्यांच्या अभ्यासक्रमातून सामाजिक मूल्ये जोपासली पाहिजे. मोठ्यांचा आदर, आपुलकीची भावना, एकोपा, बंधुता निर्माण झाल्यास समाजाचा विकास होईल. विद्यार्थी शालेय शिक्षण घेऊन जेव्हा समाजामध्ये येतील, तेव्हा त्यांना समाजातील नियमांचे, आचरणाचे, नीतिमत्तेचे धडे मिळालेले असल्यास ते समाजाच्या विकासास योगदान देतील. समाजातील सर्व घटकांचा विचार अभ्यासक्रमाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे. स्त्री, पुरूष, बालके त्यांचा विचार व्हावा. त्यांच्या गरजा पूर्ण करणारा अभ्यासक्रम हवा. समाजातील पूर्वीच्या प्रथा व आधुनिकता ह्यांमध्ये संघर्ष निर्माण न करता समाजाच्या विकासाला पोषक मूल्य स्वीकारणारा अभ्यासक्रम असावा. समाजशास्त्रीय घटकांचा विचार करून लोकशाहीला पुरक अभ्यासक्रम निर्माण व्हावा. समाजातील वंचित घटकांच्या मागणीला प्राधान्य देणारा, वैज्ञानिकतेला प्राधान्य देणारा, धर्मनिरपेक्षता निर्माण करणारा व जेणेकरून समाजामध्ये श्रेष्ठ कनिष्ठतेची भावना निर्माण न होऊ देणारा हवा. बंधुता, मित्रत्व, एकोप्याचे नाते निर्माण करणारा अभ्यासक्रम असल्यास समाजाचा विकास होण्यास मदत होऊ शकेल.

ड) भौगोलिक संदर्भ

भारत हा लोकशाही प्रधान देश असल्याने अनेक गोष्टी सहज शक्य आहेत. प्रत्येक राज्यात विविधता आहे. उदा.

भौगोलिक, सामाजिक, भाषा, वर्ण, रंग इ. या विविधतेत एकतेचे सत्त्व भारताने स्वीकारलेले आहे. त्यामुळे आज खंडप्राय भारत प्रगतीच्या विकसित होण्याच्या वाटेवर दिसतो. त्या - त्या राज्यातील भौगोलिक बाबींचा अभ्यासक्रमात समावेश होणे आवश्यक आहे. काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या देशामध्ये प्रत्येक राज्यातील घटना, संदर्भांचा अभ्यासक्रमात समावेश होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तरपूर्वीची राज्य त्यात स्वातंत्र्य सैनिकांनी, समाजप्रबोधनकारांनी दिलेले योगदान मोलाचे होते. त्याचा प्रत्यय अभ्यासक्रमातून येणे आवश्यक आहे. शिक्षणाला त्या देशाच्या मातीचा रंग असतो असे म्हणतात, म्हणूनच भारतातील भौगोलिकतेचा विचार करताना, जमीन, खनिजसंपत्ती, पाणी, पिके, ह्यांच्यावरही प्रकाश टाकलेला अभ्यासक्रम हवा. त्या - त्या स्थानिकतेनुसार तेथील रोजगार, व्यवसाय, राहणीमान, संस्कृतीची ओळख करून दिल्यास विद्यार्थ्यांमध्ये राज्यराज्याविषयी आपुलकी निर्माण होईल, व एकसंध भारतामध्ये आपण सर्व एक आहोत ही भावना वाढीस लागेल. राज्य - राज्यामध्ये संघर्ष होणार नाहीत व ते प्रगतीच्या आड येणार नाहीत. याउलट परस्पर सहकार्याने विकास होऊ शकतो, हे प्रत्ययास येईल. ह्या सर्वांला अभ्यासक्रमात स्थान दिले जावे.

ढ) सांस्कृतिक संदर्भ

शिक्षणामुळे संस्कृती संक्रमण व संवर्धन झाली पाहिजे. भारताला प्राचीन इतिहास, संस्कृती, एकतेची भावना आहे. लोकशाही प्रधान व्यवस्था भारताने स्वीकारलेली आहे. भारताचे सांस्कृतिक कार्यात वेगळे स्थान आहे. मोहेंजोदडो संस्कृतीपासून ते आधुनिकीकरणापर्यंत चांगल्या समाजास अनुरूप लोकशाहीस पूरक असणाऱ्या बाबींचे सर्व स्तरांत स्वागतच झालेले आहे. आधुनिक युगामध्ये जागतिकीकरणाच्या प्रवाहात भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे. या संस्कृतीमध्ये अनेक जाती, धर्म एकोप्याने नांदतात.

३.४ समारोप

कोणत्याही देशात शिक्षणाचा आराखडा व अभ्यासक्रम ठरविताना दहा ते पंधरा वर्षांमध्ये होऊ घातलेल्या शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बदलांचा विचार केला जात असतो. तसेच भविष्याचा वेध घेऊन अभ्यासक्रमाची निर्मिती केली जाते. जसे भारतामध्ये अलीकडे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF)२००५, महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF) २०१०, शिक्षणाचा अधिकार (RTE) २००९ व शिक्षक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCFTE) २०१० यांचा समावेश होतो. हे सर्व शिक्षणाबाबतचे महत्त्वाचे व प्रमाणभूत दस्तऐवज मानले जातात. यावरूनच भारतातील पुढील शैक्षणिक वाटचालीची दिशा ठरत असते.

गाभाघटक यांची रुजवणूक अध्यापनातून होते. शिक्षक उद्दिष्टांचा विचार वर्ग अध्यापन करताना कमी प्रमाणात करतात असे संशोधनात आढळून आले आहे. विद्यार्थी गणितात कच्चे राहतात, इंग्रजीत मागे पडतात त्याचे कारणही हेच आढळले. अध्यापनाची सामान्य उद्दिष्टे, विशेष उद्दिष्टे, अनुदेशन प्रक्रिया यांचे सखोल ज्ञान होण्यासाठी अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाच्या अभ्यासातून अध्ययनविषयक पूर्वज्ञान, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली कृतीकौशल्ये समजतात. अभ्यासक्रमाच्या अभ्यासातून विषयांतर्गत व घटक उपघटकात असलेला संबंधही समजतो व अध्यापनात नेमकेपणा येतो.

३.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

अभ्यासक्रम (curriculum) : शाळेत मिळणारे सर्व प्रकारचे अनुभव म्हणजे अभ्यासक्रम.

पाठ्यक्रम (syllabus) : एका इयत्तेचे अध्ययन - अध्यापन व मूल्यमापन विषयक नियोजन.

पाठ्यपुस्तक (textbook) : शाळेत शिकवल्या जाणाऱ्या विषयाचे छापील पुस्तक.

ध्येये (goals) : शैक्षणिक विकास साधण्याचे दुरगामी मार्ग.
हेतू (purpose) : शैक्षणिक विकास साधण्याचे तत्कालिन मार्ग.
उद्दिष्टे (objectives) : विद्यार्थी विकासाचे सामान्य व विशिष्ट हेतु.
गाभाघटक (core cemponents) : अभ्यासक्रम निर्मितीसाठी NDE १९८६ धोरणानुसार विचारात घेतले जाणारे १३ घटक (१०+ ३)
मूल्ये (values) : जीवनविषयक विचार.
जीवनकौशल्ये (lifeskills) : जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेली १० जीवनकौशल्ये.
अध्ययनअनुभव (learning experience) : अध्ययन व अध्यापनद्वारे मिळणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनुभव.
विषयवस्तू (content) : विषयअभ्यासासाठी निश्चित केलेला आशय.
मुक्तपुस्तके (open books) : इंटरनेट व इतर माध्यमाद्वारे प्रकाशित होणारे पुस्तक.
अनुदेशन (instruction) : शिकणे व शिकवणे म्हणजे अनुदेशन होय.
निर्देशनात्मक ज्ञान (directional knowledge) : संबोध माहिती, तत्त्वे, नकाशा, मजकूर इत्यादीद्वारे दिले जाणारे ज्ञान.
प्रक्रियात्मक ज्ञान (procedural knowledge) : कृती आधारित ज्ञान.
उत्तरदायित्व (accountability) : जबाबदारी
राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (National curriculum framework): एन.सी.ई.आर.टी.ने प्रकाशित केलेला शालेय अभ्यासक्रम आराखडा २००५.

३.६ क्षेत्रीय कार्य

(१) तुम्ही शिकवत असलेल्या शालेय स्तरावरील अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक यांच्यातील परस्पर संबंध खालील मुद्दयांच्या अनुषंगाने सविस्तर स्पष्ट करा.
(अ) अभ्यासक्रमात विद्यार्थी सर्वांगीण विकासाचा विचार असतो.
(आ) पाठक्रम हा विद्यार्थी शिक्षक यांचे उत्तरदायित्व दर्शवणारा आराखडा असतो.
(इ) पाठ्यक्रमाच्या आशयाचे स्वरूप पाठ्यपुस्तकात पहायला मिळते.
(२) खालील तक्त्याच्या साहाय्याने तुमच्या विषयाच्या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण करा.

घटक/ उपघटक	आशयाचे स्वरूप	उद्दिष्ट्ये	गाभा घटक	मूल्ये कौशल्ये पद्धती	जीवन अध्यापन तंत्रे	अनुरूप अध्यापन साधने	अनुरूप मूल्यमापन	अनुरूप

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

भोसले र. अ. आणि डोणे उ.म. (२००९). शिक्षणातील बदलते विचारप्रवाह. कोल्हापूर : फडके प्रकाशन.
डिसोझा ए. आर. (२०१६). ज्ञान आणि अभ्यासक्रम. दिल्ली; हिमालय पब्लिशिंग हाऊस.
जोशी अ. ना. (२००२). आणि साळुंके कविता. आशययुक्त अध्यापन पद्धती मूलभूत नाशिक; य.च.म.मु.वि.
मुनाली टी. अभ्यासक्रम विकसन. हैद्राबाद; निलकमल प्रकाशन.
महाले, संजीवनी. आणि कर्डिले, वसंत. व साळुंके, कविता (२०१७). ज्ञान आणि अभ्यासक्रम. म.य.म.मु. विद्यापीठ,

नाशिक;
पिचड, नलिनी. व बरकले, रामदास. (२००७), मातृभाषा मराठीचे अध्यापन शास्त्रीयविश्लेषण. नाशिक; इनसाईट प्रकाशन.
जोशी ए.एन. आणि साळूंके के. एस. (२००६). आशययुक्त अध्यापन पद्धती नवी दिल्ली; प्रेंटीस हॉल ऑफ इंडिया लि.,
यशवंतराव चव्हान महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक. (२०१६). अभ्यासक्रमाची भाषा विद्यशाखा व विषयाचे आत्मसातीकरण.
साळुंके, कविता. (२००४). आशययुक्त अध्यापन पद्धती. मुंबई; लॉगमन प्रकाशन. नाशिक.
वझे, एस.आर. आणि पाटील, मिलिंद. (२००४). आशययुक्त अध्यापन पद्धती; इंग्रजी. नाशिक; मिनाक्षी वझे प्रकाशन.
कुलकर्णी अनिल, (२००१) ''शिक्षणाचे बदलते संदर्भ'', सकित प्रकाशन, औरंगाबाद.
चव्हान, महाले, पाटील, (२००३) ''माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आणि शैक्षणिक मूल्यमापन'',नाशिक, प्रकाशक प्रिंटलाईन्स
महाले संजीवनी, (२००५), ''अध्यापन प्रतिमाने आणि अध्ययन शैली'', युनिक पब्लिकेशन, औरंगाबाद.
जोशी अ.न., सोहनी चित्रा, ओक सुमन, (१९९२).''शैक्षणिक तंत्रविज्ञान'', नाशिक य.च.म.मु.वि.
जगताप ह. ना., बोंदार्डे. अ., (२०१६), ''ज्ञान व अभ्यासक्रम'', पुणे, सुविचार प्रकाशन मंडळ.
पारसनीस न.श. ''शिक्षणाची समाजशास्त्रीय भूमिका'', पुणे, नूतन प्रकाशन.
बरवे मिनाक्षी; (१९९७) ''अभ्यासक्रम व शैक्षणिक मूल्यमापन'', पुणे, नूतन प्रकाशन.

इंटरनेट संदर्भ

https://www.youtube.com/inspiringEducation
http://www.kedifference.com/difference-between syllabus curriculam.html
https://en.wikipedia.org/wiki/syllabus
https://en.wikipedia.org/wiki/syllabus-retrived07.11.2017